त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६१, अंक २–४, शक १९०४–५

(शिव-चरित्र-साहित्य, खंड १४)

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Year 61, No. 2-4, Oct. 1982-April 1983

(Records of the Shivaji Period, Vol. 14)

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहासासंबंधी निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source-material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६१, अंक २–४, शक १९०४–५

(शिव-चरित्र-साहित्य, खंड १४)

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Year 61, No. 2-4, Oct. 1982-April 1983

(Records of the Shivaji Period, Vol. 14)

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्यांच्या नियमानुसार अनुदान मिळाले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

अनुक्रमणिका

पत्रांची छायाचित्र

(कालक्रमानुसार)

———

निवेदन

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचा प्रस्तुत अंक 'शिवचरित्र-साहित्य', १४ वा खंड या स्वरूपात प्रसिद्ध होत आहे. यापूर्वीचा १३ वा खंड शके १८८६ च्या शिवजयंतीच्या दिवशी, म्हणजे दि. २० मार्च १९६५ रोजी, प्रसिद्ध झाला होता; व तो त्रैमासिकाचा जोड अंक म्हणूनही (त्रैमासिक, वर्षे ४१ व ४२, अंक १ ते ८, स्वीय ग्रंथमाला क्र. ९५) प्रकाशित झाला.

प्रस्तुत अंकात एकूण ४४ पत्रे समाविष्ट केली आहेत. या पत्रांचा काल डिसेंबर १५४० ते शाहू महाराजांच्या राज्याभिषेकापर्यंतचा, म्हणजे जानेवारी १७०८ पर्यंतचा आहे. यात शिवजन्मापूर्वीची ५ पत्रे, शिवजीवनकालीन १३ पत्रे, संभाजीकालीन ८ पत्रे, राजारामकालीन ६ पत्रे आणि राजाराम ते शाहूपूर्वकालातील १२ पत्रे आली आहेत.

या खंडासाठी मुख्यत्वे मंडळाच्या संग्रहातील तीन दफ्तरांतील कागदपत्रे निवडली आहेत. वाईकर देशपांडे यांच्या दफ्तरातून ११, चिंचवडकर देव यांच्या दफ्तरातून १४, लक्ष्मेश्वर देसाई यांच्या दफ्तरातून ७ व इतर संकीर्ण १२ अशी निवड केली आहे.

पत्रांचे विषय विविध स्वरूपाचे आहेत. त्यांवरून शिवकालातील सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादि बाबींवर अधिक प्रकाश पडण्यास मदत होईल असा भरवसा वाटतो.

शिवराज्याभिषेक दिन, श. १९०५
दि. २३ जून, १९८३

संपादक

प्रस्तुत खंडातील पत्रें खालील पद्धतीने सादर केली आहेत :

१. पत्राचा अनुक्रमांक
२. त्याखाली डाव्या हातास संदर्भ-संग्रह व त्या संग्रहातील पत्र-क्रमांक
३. त्याखाली पत्रात उल्लेखिलेली मूळ तारीख
४. उजव्या हातास प्रथम शालिवाहन शकातील पत्राची तिथि
५. त्याखाली इसवी सनातील तारीख
६. पत्रावर असणाऱ्या शिक्क्यांचे संक्षिप्त वर्णन इत्यादि
७. मूळ पत्र. आवश्यक तेथे लिपि इत्यादींचा खुलासा पत्रातच केला आहे.
८. आवश्यक तेथे पत्रावर स्पष्टीकरणार्थ टीपा

———

शब्दसंक्षेप

इ. = इसवी सन
जु. = जुलूस सन
नि. = निराळया हस्ताक्षरात
फ. = फसली सन
फा. आ. = फाटला आहे (कागद)
मो. जा. = मोकळी जागा
(* * * = अक्षर लागत नाही.)

रा. = राज्याभिषेक शक
व. = वद्य
श. = शके (शालिवाहन)
शु. = शुद्ध
सु. = सुहूर सन
हि. = हिजरी सन

———

संदर्भ-संक्षेप

गो. पु. = गोवे पुराभिलेखागार संग्रह
प. = पत्र क्र.
प. द. = पां. न. पटवर्धन दफ्तर, भा. इ. सं. मंडळ संग्रह
मुं. पु. = मुंबई पुराभिलेखागार संग्रह
ल. दे. = लक्ष्मेश्वर देसाई दफ्तर, भा. इ. सं. मंडळ संग्रह
वा. दे. = वाईकर देशपांडे दफ्तर, भा. इ. सं. मंडळ संग्रह
वाड रु. = वाड रुमाल, पुणे पुराभिलेखागार संग्रह
सं. द. = संकीर्ण दफ्तर, भा. इ. सं. मंडळ संग्रह

———

१. वाईकर देशपांडे

वाई येथे मुख्यतः दोन देशपांडे घराणी आहेत : (१) रामडोह आळीतील पंत-राजाज्ञा आंधळीकर देशपांडे (२) रविवार पेठेतील दगडी दरवाजा किंवा उंब्रजकर देशपांडे. या दोन देशपांडे घराण्यांचे आज जरी भाऊपणाचे संबंध नसले तरी ते समगोत्रज आहेत. त्यांपैकी पंत–राजाज्ञा–देशपांडे घराण्याच्या कागदपत्रांसंबंधी मी एक लेख इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या, इ. १९५० मध्ये नागपूर येथे भरलेल्या २७ व्या अधिवेशनात वाचला होता. तो त्या कमिशनच्या २६ व्या वृत्तांत–ग्रंथात प्रकाशित झाला आहे. त्यांजकडील कागदपत्रे या मंडळाच्या ‘ शिवचरित्रसाहित्या’च्या ११ व्या खंडात (१९५८) ‘वाई-पंत-राजाज्ञा’ या नावाखाली मी प्रकाशित केली आहेत. पण या घराण्याची दहा पत्रे माझ्यापूर्वीच कै. द. वा. पोतदार यांनी ‘ऐतिहासिक संकीर्ण साहित्य ’ खंड १ (मंडळ त्रैमासिक, वर्ष ९, अंक ३) मध्ये प्रकाशित केली होती. उंब्रजकर देशपांड्यांच्या घराण्यातील काही कागद त्या घराण्याच्या मुख्य शाखेतील नुकतेच दिवंगत झालेले माझे वैकुंठवासी वर्गबंधू व्यंकटेश दत्तात्रय देशपांडे यांजकडे सुमारे चार वर्षांपूर्वी मला पहावयास मिळाले. त्यांवरील एक लेख मी इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या, इ. १९७९ साली औरंगाबाद येथे झालेल्या ४७ व्या अधिवेशनात वाचला होता. तो त्या सालच्या वृत्तांतात प्रकाशित झाला आहे. मी पहिल्या लेखात पंत-राजाज्ञा-देशपांडे यांची एक कामापुरती व दुसऱ्या लेखात उंब्रजकर देशपांडे यांचीही कामापुरती, अशा दोन वंशावळी दिल्या आहेत. पहिल्या वेळी या दोन देशपांड्यांचे संबंध जुळविता आले नव्हते. परंतु आता ते काहीसे जुळविता येतात.

आंधळीकर देशपांडे यांची वंशावळ अशी :

- १ विठ्ठल
  - २ बल्लाळ
    - ३ अनंत (अंतो)
      - जिवाजी
        - मोरेश्वर
          - हरी
    - ३ विश्वनाथ (विसो)
    - ३ कृष्ण
  - २ सोनदेव
    - ३ नरसिंह (नरसो)

उंब्रजकर देशपांडे यांची वंशावळ अशी :

- १ गोविंद
  - २ लहमाजी
    - ३ अंतो
      - ४ भिकाजी
        - ५ चंदो
          - ६ रुद्राजी
    - ३ शंकर (संको)
      - ४ अण्णाजी
    - ३ दत्तो
      - ४ लहमाजी
        - ५ झुंगो
          - ६ गिरमाजी
      - ४ तिमाजी
        - ५ कासी (दियानतराव)
          - ६ त्रिमलराव
            - ७ दत्तो
              - =
                - ११ दत्तात्रेय
                  - १२ व्यंकटेश
          - ६ लक्ष्मणराव
          - ६ (इतर १)
        - ५ हरी
        - ५ (इतर ३)
      - ४ रत्नाजी

या दुसऱ्या देशपांडे घराण्यातील चौथ्या पिढीतील कासी तिमाजी हा गृहस्थ मुहम्मद व दुसरा अली आदिलशाह यांच्या कारकिर्दीत विशेष प्रसिद्धीस आला. तो प्रथम आदिलशाही दरबारात सभासद म्हणून होता. एकदा त्याला सीदी जौहरकडे त्याचे मन वळविण्यासाठी पाठविले असता तसे करून तो त्यास घेऊन दुसऱ्या अली आदिलशाहाकडे आला. बहुधा त्याच्या या कामगिरीमुळे किंवा त्याच्या धार्मिक वृत्तीमुळे त्यास 'दियानतराव' ही पदवी मिळाली असे दिसते. ही पदवी पुढें आनुवंशिक झाली असावी. कारण त्याच्या मुलाने तर निश्चितच व नातवानेही बहुधा ती लावलेली आहे.

मंडळाच्या हस्तलिखित ग्रंथसंग्रहात अगस्त्यसंहितेची एक पोथी असून ती या दियानतरावाच्या आश्रयाखाली लिहिली असावी असे दिसते. त्याने विजापूरचा एक सेनापति सरनौबत फतहखान याच्या पदरी काही काळ नोकरी केली असावी. फतहखानाला इ. १६४९ मध्ये विजापूरकरानी शिवाजीविरुद्ध पाठविले होते. त्यात फतहखान

पराभूतही झाला होता. अफजलखान आणि दियानतराव यांचे ठीक नव्हते असे दिसते. अफजलखानाने दियानतरावाचे वतन जप्त केले होते. ते वतन त्यास परत मिळवून देण्यात शहाजी व इतर काही दरबारी मुत्सद्दी यांचे अंग होते. राजवाडे खंड ८ मध्ये आरंभीच याने निळोपंत मुजुमदार (शिवाजीचा) यास लिहिलेली दोन पत्रे उपलब्ध आहेत. त्या पत्रांत दियानतरावाने निळोपंतास विनंती केली आहे की, ओझर्डे हे गाव शिवाजीच्या लोकांनी जबरदस्तीने ताब्यात घेतले असून ते त्यास परत मिळावे. 'बसातीन-उस्सलातीन 'मध्ये जी माहिती आली आहे तीवरून असे दिसते की, इ.१६७२ मध्ये दुसरा अली आदिलशाह मेल्यानंतर सिकंदर आदिलशाह राज्यावर येण्याच्या वेळी सिकंदरचा मुख्य प्रधान कोणी व्हावे याविषयी वाद उत्पन्न झाला असता दियानतरावाने खवासखानाची बाजू घेतली होती. परंतु खवासखानाने ते पद स्वीकारण्याचे नाकारल्या-नंतर तो बहलोलखानाच्या पक्षास जाऊन मिळाला. पुढे त्याच्या व इतरांच्या आग्रहावरून बहलोलखान मुख्य प्रधान झाला.

या संबंधावरून एवढे स्पष्ट होते की, उंब्रजकर देशपांडे घराणे जुने, म्हणजे शिवकालीन किंवा शिवपूर्वकालीन आहे. एवढेच नव्हे तर प्रस्तुत उंब्रजकर देशपांडे व कऱ्हाडकर देशपांडेही फार जुने आहेत. मला तर असे दिसते की, खांबटकीच्या घाटाच्या दक्षिणेपासून ते प्रायः मिरजेपर्यंत जो प्रदेश आहे तो सारा कऱ्हाडकर देशपांडे आणि त्यांचेच भाऊबंद उंब्रजकर देशपांडे व वाईकर देशपांडे यांच्यात विभागलेला होता.

अशा या उंब्रजकर देशपांडे घराण्याकडील कागदपत्रे येथे प्रकाशित होत आहेत. त्यांपैकी अगदी पहिले पत्र (वा. दे., प. ६, ७) शक १५१४ (इ. १५९२) चे आहे. यात तत्कालीन पंत-देशपांडे घराण्यांपैकी बल्लाळाचे (बाळाजीचे) पुत्र अंतो, विसो व कृष्णो, आणि नरसो सोनदेव व रंगो, हे वाई परगण्याचे व वाई गावाचे कुलकर्णी, म्हणजेच देशपांडे, तसेच पेठेतील लहानमोठे व्यापारी, इत्यादींनी उंब्रजकर देशपांड्यांपैकी लहमाजीचे मुलगे अंतो, सखो (शंकर) व दत्तो यांस या पत्राने लिहून दिले आहे की तुम्ही व आम्ही गोत्रपुरुष आहो; आमच्या देशपांडेपणाच्या मिराशी हकात वाईचे एक रहिवासी थिटे यांनी दावा उत्पन्न केला: त्याबाबत आपली मदत मिळावी म्हणून वाई परगण्याचे निम्मे देशपांडेपण आम्ही तुम्हाला दिले. आता तुम्ही म्हणू लागला की, वाईचा कसबा व पेठ आणि वाई परगण्यातील मुऱ्हे समनेमधील गावे यांचे अर्धे देशपांडेपणही द्यावे. तरी आपल्या इच्छेनुसार आपण मागत आहात ते सर्व तुम्हास देत आहो. आम्हास साहाय्य करून आमचा शत्रू जो थिटे त्याचा नाश करावा. तुमच्या हिश्श्याचे देशपांडेपण तुम्ही व आमच्या हिश्श्याचे आम्हो चालवावे. बावधनचे निम्मे कुळकर्ण आमचे आहे; त्यातील निम्मे तुम्हास दिले आहे. आता तुम्ही आम्ही सर्वच जण बाळो विठ्ठलाचे पुत्र असे समजून, आमच्या कामात काही उणेपणा पडला तर तुम्ही तो सावरून घ्यावयाचा आहे. आता या मिराशीबाबत कोणताही प्रश्न उत्पन्न झाला तरी तो दोघांनी मिळून त्या-बाबत निम्मीनिम्मी वाटणी करून सोडवावयाचा आहे. आपले कऱ्हाडच्या बाजूचे जे

देशपांडेपण आहे त्याशी आमचा काही संबंध नाही असे समजावे.

वरील हकीगतीवरून एवढे स्पष्ट होते की, वाईस आरंभी पंत–राजाज्ञा–देशपांडे हे आपले देशपांडेपण स्वतंत्र रीतीने करीत असता थिटे नावाच्या कोणी वाईकर इसमाच्या दांडगाईमुळे त्या देशपांड्यांनी वाई परगण्यावरील आपल्या देशपांडेपणाचा अर्धा हिस्सा उंब्रजकर देशपांड्यांना दिला आहे.

याच विभागात पीड नायक बहिरी यास उद्देशून काही पत्रे आली आहेत (वा. दे., प. २०, १, २). डॉ. ना. इ. कुलकर्णी यांनी या बेरड घराण्यावरच प्रबंध लिहून पीएच्. डी. पदवी मिळविली आहे. त्यांनी पुरविलेली या घराण्याची कामापुरती वंशावळ अशी :

१. पाम नायक (इ. १६२२ ते १६५६) – २. पीड नायक (इ. १६५७ ते १६७४) – ३. दुसरा पाम नायक (इ. १६७५ ते १६९५) – ४. पीतांबर बहिरी पीड नायक (इ. १६९५ ते १७२४)– ५. तिसरा पाम नायक(इ. १७२४ ते १७४१) – ६. दुसरा पीतांबर बहिरी पीड नायक (इ. १७४२ ते १७४६)–७. व्यंकटप्प नायक (इ. १७४७ ते १७५२)

डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या या वंशावळीत बहिरी पीड नायकाच्या मागे ‘ पीतांबर ’ हे उपपद लावलेले आहे. येथील तीनही पत्रांत ‘ पीतांबर ’ हे उपपद लावल्याचे आढळत नाही. वा. दे., प. २० मध्ये दियानतराव बहिरी पीड नायकाचा साहाय्यक म्हणून उल्लेख आला आहे. पण दियानतरावामागे वैकुंठवासी हा शब्द लावला आहे. यामुळे हे पत्र दियानतराव मेल्यानंतरचे आहे. बराच शोध करूनही, दियानतराव नेमका केव्हा मृत्यु पावला हे निश्चित करता आले नाही. तथापि इ. १६८० नंतर फार दिवस तो वाचला असेल असे वाटत नाही. तो वारल्याबरोबर त्याच्या त्रिमलराव व लक्ष्मणराव या दोन मुलांमध्ये मिळकतीविषयी भांडण सुरू झाले. त्यात लक्ष्मणरावाने त्रिमलरावावर छापा घालून त्याचा सर्वस्वी नाश केला. त्रिमलरावाचा जीव तेवढा वाचला. त्यांचे भांडण तोडावे म्हणून रुद्रो चिमणाजी या त्यांच्या भाऊबंदाने यादगिरी (जि. रायचूर) येथील देशमुख बाबाजी त्रिलोचन यास विनविले होते. आपणही या बाबतीत लक्ष्मणरावास नीट समजावून सांगून भांडण तुटेल असे करावे, अशी या पत्रात विनंती केली आहे.

वा. दे., प. १ च्या पत्रात कोणा मल्हारी अंबाजीने बहिरी पीड नायकास या दोन भावांमध्ये चाललेले भांडण यथान्याय मिटवून त्यांची एकी करण्याबद्दल विनंती केली आहे.

वा. दे., प. २ हे पत्र कऱ्हाडचा देशकुलकर्णी व सरदेशकुलकर्णी रुद्राजी चंदो याने लिहिले आहे. उपर्युक्त त्रिमलराव हा, रुद्राजी चंदोचा नातू आपणास दत्तक द्यावा, अशी विनंती करीत होता. तीस रुद्राजी चंदोने, आपण मान्यता दिली आहे असे कळविले आहे.

या तीनही पत्रांवरून, वाईच्या या देशपांडे घराण्याचा पीड नायकाच्या घराण्याशी अत्यंत निकटचा संबंध होता, याविषयी खात्री होते.

वहिरी पीड नायकाविषयी थोडी अधिक माहिती देऊन ही चर्चा संपवू. कर्नाटकातील कलबरगे जिल्ह्यात वागिनगेरे नावाचे एक गाव आहे. तेथे सोळाव्या शतकात एका बेरड जमातीच्या गृहस्थाने एक लहानसे राज्य स्थापन केले. अशा लहान राज्याला कर्नाटकात 'पाळे' म्हणत. तेथील प्रमुख तो पाळेगार. उपर्युक्त पाळ्यात सगर (नुसताबाद), शोरापूर व वागिनगेरे अशी तीन गावे प्रमुख होती. या पाळ्याचा एक छोटा इतिहास कलबरग्याचे श्री. कृष्णराव कपटराळ यांनी लिहिला आहे. 'फरामीनुस्सलातीन' या ग्रंथात औरंगजेबाचे हि. १०६८ (जुलूस १) रमजान (२७ मे १६५८) या तारखेचे एक फर्मान दिले आहे. त्यात औरंगजेबाने पीड नायकास, "तुमच्या अपराधाबद्दल क्षमा केली असून, तुम्हास नुसताबादेची सरदेशमुखी दिली आहे," असे सांगितले आहे. सिद्दी जौहरने पन्हाळगडास वेढा घातला असता त्याच्या सैन्यात पीड नायक होता, असा परमानंदाच्या 'शिवभारता'त उल्लेख आला आहे.

— ग. ह. खरे

Deshpandes of Wai

There were two principal Deshpande families at Wai near Satara : 1. Pant-Rajajnya (Andhalikar) Deshpande, and 2. Umbrajkar Deshpande. Kasi Timaji, belonging to the latter family, came to occupy an important position in the Court of Ali Adil Shah II of Bijapur. There he earned the title of 'Diyanatrao'. It appears that it was at his instance, along with that of others, that Bahlol Khan accepted the prime ministership of Bijapur after 1672. Thus, the Umbrajkar Deshpande family appears to have played an important part in the history of this region even from pre-Shivaji times.

The letters that appear in this section, relating to these two families, throw light on their inter-relations. A resident of Wai, one Thite had raised issues relating to the Mirashi rights with the Pant-Rajajnya family. The latter, thereupon, sought the help of Umbrajkar family in this regard by surren-

dering to them half the rights of their own Deshpandeship.

A second set of important papers, which need a special mention, relates to the Bahiri Pid Nayaks of Wagingere in Kalbarge district of Karnataka. They belonged to the Berad community and had established a small principality of their own containing important towns like Nusratabad, Shorapur and Wagingere. From the letters appearing here it becomes clear that the Pid Nayaks of Wagingere and the Deshpandes of Wai had continuous and close contacts. The Pid Nayaks had received formally again the Sardeshmukhi rights of Nusratabad from Aurangzeb in 1658. The Pid Nayak was in Shivaji's army during Siddi Johar's expedition against the fort of Panhala in 1660.

——

– १ –

वा. दे., प. ६, ७
श. १५१४ श्रावण व. ९

श. १५१४ श्रावण व. ९
इ. १५९२ ऑगस्ट २१

·॥ र्द स्वस्तिश्री सके १५१४ नदन सवछरे स्रावण वधी नवमी सोमवार तदिनी अतो लाहामाजी वा सखो लाहामाजी व दतो लाहामाजी उवरजकर यासी अतो बलाल वा विसो बलाल वा क्रुस्णो बलाल वा नरसो सोनदेऊ वा रंगो [* फा. आ.] पा॥ वाई वा गावकुलकरणी [क] सबा वा बकाल वा पेठ कालवट बाजे खूम वा गावकुलकरणे समत मुन्हे पा॥ मजकूर यानी सु [॥] सलास कार्ण लिहून दिल्हे यैसे जे पा॥ मजकुरीचे मिरासी सिसातरगत अमची अम्ही चालवीत होतो वा पा॥ कन्हाडीचे देसकुलकरण तुम्ही सिसातरगत चालवीत होतेसी पुढे अमचे मिरासीस थिटे याने खलल माडिले त्याबदल तुम्ही आ [म] चे गोत्रपुरूस म्हणै (णौ) न पा॥ मजकूरचे देसकुलकरणाची निमे तकसीम दिल्हे आसे आणि आता तुम्ही म्हणो लागलेसी जे कसबा वा बक(का)ल वा पेठ कालवट वा बाजे खूम कसबे मजकूर वा गावकुलकरण सा॥ मुन्हे याची निम तकसीम आपणासि देणे म्हणे (णौ) नू तरी देसकुलकरण पा॥ मजकूर वा कसबा वा बकाल वा पेठ कालवट वा बाजे खूम वा गावकुलकरण समत मुन्हे याचे निम तकसीम तुम्हासि दिल्हे आसे आपली तकसीम घेउनू आमचे पाठी राखोनू दुस्मानाचे हात तोडून सुखे असिजे वा मौजे वाहुधणीचे कुलकरण निमे तकसीम आम्हासि येते त्याचे

निम तकसीम तुम्हासि दिल्हे आसे वाडीलपण अमचे आम्ही चलवावे आता तुम्ही वा आम्ही भाऊपणे चालोन आवघे बालो विठलाचे पुत्र येणे रिती चालावे जेथे आमचे उणी पडेल ते तुम्ही पेस करणे आता पुढे जो कोण्ही वडीलपणास * * * यासी जे काही [उ] पायेतर होईल ते दो ठाई वाटून प्रमाणपूर्वक देणे वा व्रुतीसमधे दिवाणीचे जे काही पडेल ते दो ठाई देणे वा तागादियावदल जे काय्रे मिलेल तेही दो ठाई वाटून देणे वा पा। कराडीचे देसकुलकरण वा गावकुलकरणे तुमचे मिरासी त्यासि आम्हासि समधू नाही वा तुमचे गोत्रपुरुसासि आणि पा। मजकुरासि समधू नाही येणे-प्रमाणे चालावे हे सते

■ ■ ■

– २ –

वा. दे., प. ५ — श. १६१० आश्विन व. ३०

जु. ३२ जिल्हेज २८ — इ. १६८८ ऑक्टो. १४

नक्कल परवाना परसी
ची

मुल्फिदखान

नकल परवाने देसमुखी पा। कराहाड वमोहर खाने आलीशान [* मो. जा.] आकी मुसदियानी मुजारियानी व रयानीबराया व साहीर जमेदारानी पा। कराहाड विदानद दरविला देसमुखी पा। मजकूर वतहवुर जलालत दस्तगाहा जानराऊ मो। केली ये बाबे हजूर लेहून पाठविल अहे रास्ती दुरस्ती व किफायत अदसी जे अवाब लाजिमा आहे ते करून परदाख करून दर अबादानी मुळूक व रयेत नातवाना हाल अहे त्याची परदाख करणे व जिराती कीर्दी मामुरी करणे जे लोक तेथ वसाताती त्याचा गौउर करणे रोजबरोज मामुरी पा। मजकूर होये माल वाजीव टका जो होईल तो करोडीस देणे रयत मजकुरावरी जुळूम जाजती न व्होये मा।नुलेसी देसमुखी पा। मजकूरची मुस्तकीन दिल्हे असे त्याचे रजेखेरीज कामकाज न करणे रजेतलबेमधे राहाणे दरीबाब ताकीद असे छ २८ जिल्हेज सन ३२ बतीस

■ ■ ■

– ३ –

वा. दे., प. ४
फ. १०९९ मोहरम २७

श. १६११ कार्तिक व. १४
इ. १६८९ ऑक्टो. ३१

(पत्राच्या आरंभी उजवीकडील कोपऱ्यात फारसीतील वाटोळा शिक्का)

(मोडी लिपीतील मजकूर)

खालिसे सेरीफ

(फारसी मजकूर)

कौलनामह बइस्म रुद्राजी देसपांदियह परगनह करहार मअ्लूम नुमायद कह * * * आबादानी शाहजादह मरहमत शुदह बखातिर जमअत नमुदह रिआया दर कस्बह करराबाद शवद हेच वसवास बखातिर नह आरद कसी मुजाहिम न खाहद शुदह बखातिर जमअत आयद * * * शवद तहरीर फी २६ शहर मोहर्रम सनह १०९९

(मराठी मजकूर)

र्द कौलनामा बो। रुद्राजी चदो देसपाडिये पा। कऱ्हाडी सा। रायेबाग सुबे दारुल-जफर विज्यापूर सुा। सन हजार १०९९ कारणे कौलनामा लेहोनू दिधला ऐसा जे तुमचे बाबे पिराजी यादव पदाजी यादव देसमुख पा। मा। हजूर येउनू जाहीर केले की माइले मातवर देसपाडिया आहे धामधुमेकरिता पा। टाकून गेला होता हाली पा। मजकूर [* मो. जा.] जाला आहे हे खबर आयेकोनू पा। मो। येउनू आपणे व पा। आबाद करीण म्हणउनू उमेद धरीत आहे साहेबी मेहरवान होउनू कौल ऐनायेत जालिया येउनू आबाद हा (हो) ईल आणि साची किफायेत करील म्हणउनू माळूम केले बराये माळुमाती खातिरेसी आणौनू तुम्हास कौल दिधला आहे व पा। मावरी ठाणेही येत आहे तुम्ही आपली खातीरजमा राखोन आबाद होणे व रयेतीचा दिलासा करुनू पा। आबाद कीजे आपण पा। मजकुरास स्वारी करुनू येउनू ते वख्ती मुलाजमत कीजे आबादानीस कोताई न कीजे [* नि] मोर्तबू सुद

(पत्राच्या पाठीमागील मजकूर)

तेरीख २७ माहे मोहरम

पीर सेख माहमद कराड

■ ■ ■

– ४ –

वा. दे., प. ३ श. १६११ मार्गशीर्ष व. ३
फ. १०९९ सफर १६ इ. १६८९ डिसें. १९

(पत्राच्या आरंभी डावीकडील कोपऱ्यात एक व उजवीकडील कोपऱ्यात एक फारसीतील वाटोळा शिक्का)

(फारसीतील मजकूर) (मोडी लिपीतील मजकूर)

बक्षी व वाकेनिगार **शाहाजादे अलम अजम शाहाजी**

* * *

(फारसी मजकूर)

इझ्झत आसार रुद्राजी देसपांदियह परगनह मसूर व करहार मअ्लूम नुमायद किब्लह अर्झी हकीकत दौलतख्वाही नेकूकारी शुमा मअ्लूम शुदह बूद दर बाब शुमारा कौल नविस्ता फिरिस्ताद [ह] बूद दरीं विला अज हुजूर पुरनूर देसमुखी बनाम महादजी परगनह मजकूर मुकर्रर शुदह मी बायद कह बखातीर जमअ दाश्तह परगनह मसूर करहर बाइत्तिफाक देसमूख विलायतरा आबाद नुमायद कह नेकू खिदमत शुमा बहुजूर नविश्तह आयद बखातिर जमअ दाश्तह ईं मुलाजिमत नुमायद बवक्त मुलाजिमत कारी * * * इझ्झत आसार खाहद शुद इनसराम नमूदह खाहद शुद तहरीर १६ शह्र सफर सनह १०९९ फसली

(मराठी मजकूर)

ईजत आसार रुद्राजी चंदो देसपाडिये पा। मसूर सा। रायेबाग सुबे दारुलजफर विज्यापूर सु॥ सन हजार १०९९ माळूम दानद कीं तुम्हास येकदोनी मोरतबे लिहिले की तुम्ही भेटीस येणे आणि मुळूक लावणे आपली खातरजमा असो देणे त्यासि तुम्ही तगाफुली केली आता [* मो. जा.] ने कमाल मेहरबानगी करुनू माहादजी वा। सुलतानजी देसमुख पा। मा। यासि देसमुखी दिधली आणि फर्मान करुनू दिधला आहे आणि हुकूम केला कीं पा। आबाद कीजे तरी तुम्ही व माहादजी देसमुख येकदिल होउनू परगणा आबाद कीजे यामध्ये तुम्हा दोघाचा कुली मुजरा आहे आपली खातिरजमा राखो [न] किफाये [त] सरकार कीजे कुली मुजरा आहे

■ ■ ■

— ५ —

वा. दे., प. ४
सवाल ७

श. १६१९ आषाढपूर्वी
इ. १६९७ जूनपूर्वी

(१. पत्राच्या मध्यभागी डाव्या बाजूस संताजी घोरपडयाचा अष्टकोनी शिक्का; २. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

हु

हजरत काजी पा। वाई दाम मोहवतहु

०॥ दे शरीयतपन्हा अदालत दस्तगाह अजी सादतुलदिल येकलास संताजी घोरपडे सेनापती जप्ततनमुळुक सलाम बाजद सलाम महवल मक्सूस ऊ की दिगर चितो केशव व दासो रायाजी व केसो हमले व रामाजी वीरेस्वर थिटे यामधे व शामजी लिगोजी व गगाजी शकर अधलीकर यामधे पा। मजकूरचे देसकुलकर्ण व कसबचे कुलकर्ण व पेठाचे कुलकर्णे व समत मुरे गावकुलकर्ण यासाठी गरगशा लागला आहे तरी तुम्ही हजरत काजी अहे हर दो * * * चा निवडा देसमुख व हकजवारीचे पाटील कुलकर्णी व सेटे महाजन व बारा बलुलते अदिकरून माहरदेखील मेलऊन श्रीकृष्णातीरी बैसऊन त्यास त्याचेही तालीकची क्रिया घाळून बरहक मनसुबी करून गोतमुखे उभयताचा निवाडा करून देऊन गोताचे विदमान पुरातन वृतीवंत यैसा होईल त्यास अपले मोहरेनसी महजर करून देऊन अम्हानजीक पाठऊन देणे तोवर हरदो जणाचे वतन अमानत केले असे कागदची तालीक लिहून घेऊन असल परतून देविले पाहिजे दराज लिहिणे काये असे प्यार मोहबत असो देणे रा। छ ७ सौवल निलो बपूजीने पेशजी माळुमातीचे कागद नेले अहेत त्यावर नव जाणे दराज लिहिणे काये असे [* नि] हे किता।बती

■ ■ ■

— ६ —

वा. दे., प. ८

फ. १११२ रबिलाखर १

श. १६२४ भाद्रपद शु. २
इ. १७०२ ऑगस्ट १४

श्रीपद्मावती प्रसन

ताम्र

राजश्री पिराजी यादव व रा॥ पदाजी
यादव देसमुख व राजेश्री रुद्राजी चदो
देसपाडिये पा॥ कराड गोसावी यासी

दं

अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य [* मो. जा.] स्नहाकित दताजी केशवजी ना॥ देसमुख पा॥ वाई जोहर व दडवत सु॥ सन हजार १११२ तुमच्या प्रा॥ गाव का॥ पाचवड देह ४ विता॥

मौजे पाचवड	मौजे उडतर	मौजे इडमिडे	मौजे कलवे
१	१	१	१

येणेप्रमाणं च्यारी गाव वाईकडे कबज राजेश्री सिवाजीराजे यानी केली तधीपासून वीसपचवीस वरसे कमाविसीस आमच्या माहालाकडे चालताती यैसियासी सरदहू गाव आमच्या पा॥चे नव्हत तुमच्या परगणेचे गाव तुमचे तुम्ही घेणे आम्हास मागावयासी संमध नाही पूर्वीपासून ते गाव कराहाडा पा॥ म्हणून वडिलीही सागितले आहे तरी तुमचे गाव तुम्ही घेणे छ १ माहे रविलाखर हे विनती छ

■ ■ ■

— ७ —

वा. दे., प. ९
फ. १११६ सफर २४
जु. ५०

श. १६२८ ज्येष्ठ व. ८
इ. १७०६ मे २४

(पत्राच्या आरंभी उजवीकडील कोपऱ्यात फारसीतील वाटोळा शिक्का)

(फारसीतील मजकूर)

बमजमून नविशतह हिंदवी बअमल आरन्द

(मराठी मजकूर)

अमिलान पा॥ करडाबाद सु॥ सन १११६ ईनहाये आकी रुद्राजी चदो देशपाडिये पा॥ मा॥ याचा व कृष्णाजी शकर याचा झगडा आहे यैसियासी हाली कामकाज मा॥इलेचे

तुदे देशपांडियेगिरीचे केले आहे काम खिदमत यापासून होणे हक लवाजिमा जो आहे तो याचे तुहदे करणे दरीबाब ताकीद तमाम दानद मो। शुद इनाम जमीन व देह जो माकूल भोगवटा आहे तो याचे तुहदे करणे मो। शुद तो॥ २४ माहे सफर सन ५० जलूसवाला

■ ■ ■

– ८ –

वा. दे., प. २०

श. १६३० पूर्वी
इ. स. १७०८ पूर्वी

श्री

राजमान्ये राजेश्री पिडीनायेक बहिरी गोसांवी यांसी

र्द श्रीमत सकळगुणनिधान अखंडित ळक्षमी अलंक्रुत [* मो. जा.] श्रो। रुद्रो चिमणाजी आसीर्वाद येथील क्षेम जाणौऊन अपळे स्वानंदवैभव लिहीत गेळे पाहिजे यानंतरे वैकुंठवासी राजेश्री द्यानतरायाची दया राउळाचे आस्थानावरी बहुत होती तुम्हींहीं विशेशाकारें दया करून चालविता असतां घरकळहो लावालावीचे गोष्टीने कथळा उद्‌भव होऊन रा। लक्षमणराऊ कऱ्हाडास गेले तेथेंहीं तबियेत माफीक न पडता उठून आळे रा। [त्रिम] लराऊ स्थल धरून होते त्यावरी छेपा घाळून सर्वश्वे नाश केळा जीवमात्रें वाचून आळे पहिळे उभयेतांस कथला वाढला होता आम्ही रा। बायाजी त्रिलोचन देसमुख पा। यांतगेरी यास [प्रय] त्न करून निवडिले असे बा॥ सनद रा। निर्मळराऊस वडीळपण देऊन रा। लक्षमणराऊ धाकटे केले गोसांवीही धर्मथा विचार करणेस सूज्ञ असा रा। लक्षमणरायांसही बुधीवाद सागोन मर्यादे राहेतसे करणे रा। निर्मलजा (रा) यास वडीलपण देऊन सर्वश्वे दया करून चालविले पाहिजे धर्माथा करणेस आलेश्ये न कीजे [* नि.] बहुत लिहिणे न लगे हे विनंति

■ ■ ■

— ९ —

वा. दे., प. १

श. १६३० पूर्वी
इ. १७०८ पूर्वी

श्रीराम

राजाधिराजमान्ये राजेश्री पिडीनाईक वहिरी गोसावी यास

·॥ र्दं सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृतः [* मो. जा.] प्रती स्नो मलहरी आंबाजी आसीवाद येथील क्षेम जाणून गोा याने अपुले वैभव लिहून पाठविले पाहिजे यानंतर रोा ज्यानतरायाचे मिरास गोा यानी चालवीत आहा त्यास उभयेता भावाने अपणामधे अपण भांडत आहेत त्यास कोण्ही त्याचे पक्षपात करीत अहेत कोण्ही याचे पक्षपात करितील तुम्हास उभयेता समान आहे येसियास उभयेतासी येक करूण त्याचे त्याप्राा याचे याप्राा बाा सनद बिलाकुसूर चालेसारखे करविले पाहिजे यामधे बहुत कीर्ती आहे हे आम्हासही अगत्य आहे * * * विशेष लिहिणे न लगे [* नि.] हे अस्तीवाद

■ ■ ■

— १० —

वा. दे., प. २

श. १६३० पूर्वी
इ. १७०८ पूर्वी

श्री

श्रीमत् प्रहुड दिनकर खंडेश्वरी सदा येशवंतराये राजमान्ये राजश्री पीड नाईक वहिरी सरदेशसाई माहालानिहाय प्रांत सगर गोसावी यासी

श्रेहंकित रुद्राजी चंदो देशकुलकर्णी प्राा कऱ्हाड व सरदेशकुलकर्णी माहालानिहाये कृतानेक आसिरवाद विनंती उपरी येथील क्षेम जाणऊन आपले क्षेम समाचार लेखन करणे विशेष चिरंजीव राजेश्री त्रिमलराऊ यानी कितेक आपलेकडील वर्तमान लिहिले जे आपणावरी कृपा करिताती सर्वस्वे चालविताती म्हणऊन लिहिले होते त्यावरून परम समाधान पावलो तुम्ही थोर असा तेथे काये लिहिणे चिरंजीवानी लिहिले होते की आपणासी तुमचे पुत्र नारोबा आहे त्याचा पुत्र देणे म्हणऊन लिहिले होते तरी जे पुत्र आहेत ते त्याचेच असे इतके काये लिहिणे आवशमेव मूल देऊन बहुत काये लिहिणे आमचा परामृश करीत गेले पाहिजे येक वेल चिरंजीव त्रिमलरायासी कऱ्हाडास पाठऊन

दिल्हे पाहिजे भावाबंदाच्या भेटी होतील यैसे अहे बहुत लेहावे तरी सर्वज्ञ आसा कृपा असो दीजे हे विनंति

हे विनंति

■ ■ ■

– ११ –

वा. दे., प. १०
जमादिलाखर २२

श. १६३० पूर्वी
इ. १७०८ पूर्वी

श्रीराम

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये रुद्राजी चदोपंत गोसावी यासि

सो॥ रुद्रो चिमणाजी नमस्कार उपरी पादशाजीने हमिदुदखानास हुकूम केले की आम्हास बोलाऊ पाठउनू सागणे की कऱ्हाडचे देसपाडे यासी बोलाऊ पाठउनू * * * हकीकत पुसणे आम्ही खानास बोलिले की आपुले मोहरनसी हसबल हुकूम देणे खानाने म्हणू लागले जे तुम्हास हुकूम जाहला आहे तुमचे मोहरनिसी हसबल हुकूम लेहून पाठउनू लौकरी बोलाऊ पाठविने यैसेयासी पत्रदर्शणी स्वार होउनू येणे येक घडी उजूर न कीजे याबदल मिर्याभाई माहालदारास पाठविला आहे देखत कागद आम्हाजवली येणे या माहालदारास मसाला रुपये २ दोनी दिला येक घडी दिरंग न करिता स्वार होऊन मग कागद वाचण हे विनंति

छ २२ जमादिलाखर

■ ■ ■

२. चिंचवडकर देव

चिंचवडचे देवस्थान नेमके केव्हा अस्तित्वात आले हे उपलब्ध माहितीवरून सांगणे कठीण आहे. पारंपरिक माहितीप्रमाणे पहिले मोरया गोसावी हे शके १२९७ (इ. १३७५) मध्ये जन्मले आणि १८६ वर्षांचे होऊन शके १४८३ (इ. १५६१) मध्ये समाधिस्थ झाले. एका व्यक्तीला इतके दीर्घायुष्य लाभल्याचे समजणे मोठे कठीण आहे. मोरया गोसावी हे संसारी होते, आणि त्यांची परंपराही सांसारिकच आहे. शिवकालात चिंचवडास नारायण गोसावी हे पीठावर होते. त्यांच्यापर्यंत देव घराण्यामध्ये नेमके किती महंत होऊन गेले हे निश्चित माहीत नाही. तथापि त्यांच्या तीन किंवा चार पिढया होऊन गेल्या असाव्या. इ. १३७५ ते १६७५ एवढया काळात या

गादीवर आलेले पुरुष साधुत्वातून महंतपणापर्यंत पोहोचले. त्यांना निरनिराळ्या लोकांनी दिलेल्या देणग्यांमुळे त्यांचे एक संस्थान बनले. त्यांना संस्थानच्या कारभारामुळे अनेक ऐहिक व व्यावहारिक बाबतींत लक्ष घालावे लागले आणि त्यात ते बराच रसही घेऊ लागले.

सध्या आपल्याला ठाऊक असलेली देव घराण्यातील गादीवर असलेल्या पुरुषांची वंशावळ अशी : १. मोरया गोसावी (इ. १५७६ पूर्वी)– २. चिंतामणी देव (इ. १६६३)– ३. नारायण देव (इ. १७१९ डिसेंबर १७ पूर्वी)– ४. चिंतामणी (इ. १७४१ डिसेंबर २४)– ५. धरणीधर– ६. नारायण– ७. चिंतामणी– ८. धरणीधर– ९. चिंतामणी

यांपैकी मोरया गोसावी यांजबद्दल वर माहिती दिली आहेच. त्यांचे पुत्र चिंतामणी देव ९५ वर्षांचे होऊन वारले. त्यांचे पुत्र नारायण देव हे शिवाजीमहाराजांच्या काळात जिवंत होते. त्यांचा निर्देश शिवकालात रचलेल्या ‘ राजव्यवहारकोशा ’त ‘ चिंचवडाधिवासी महानुभाव नारायणाभिध ’ असा केला आहे. हा कोश इ. १६७६ च्या सुमारास तयार झाला असल्यामुळे मोरया गोसावी फार फार तर इ. १५७६ च्या सुमारास होऊन गेले असावेत, असे वाटते. आजपर्यंत या चिंचवडच्या देवांचे जे कागद सापडले आहेत तेही या काळाच्या पलीकडे जात नाहीत. औरंगजेबाच्या कैदेत असता, संभाजीची बायको येसूबाई हिने चिंचवडच्या महंताकडे कर्ज मागितल्याचे एक पत्र प्रसिद्ध झाले आहे. या पत्रात नेमक्या कोणत्या देवांना ते उद्देशून लिहिले आहे ते नमूद नाही. पण त्या पत्राची तारीख औरंगजेबाचा जुलूस ४९ मोहरम ११ (इ. १७०५ एप्रिल १९) ही आहे. याशिवाय शिवाजीनंतरच्या औरंगजेबकालीन एका पत्रात, चिंचवडच्या देवांकडे निरनिराळ्या प्रकारचे किती हजार होन होते हे नमूद केले आहे. तेव्हा या वेळी देव हे एक श्रीमंत घराणे झाले होते एवढे स्पष्ट होते. ‘ शिवचरित्रसाहित्य ’ खंड ७ मध्ये, या देवांनी केलेल्या आडदांडपणाची एक हकीकत आली आहे. त्या प्रसंगात, चिंचवडकर देवांनी आपली मर्यादा ओलांडून राज्यकारभारात हस्तक्षेप केल्याबद्दल त्यांचा निषेध करण्यात आलेला आहे. चिंचवडकर देवांना, त्यांना नेमून दिलेल्या प्रदेशातून तांदूळ, भात, मीठ, तूप व पेंड असे जिन्नस विशिष्ट भावाने व विशिष्ट संख्येत दरसाल मिळत असत. त्यांच्यावर वेळोवेळी, अधिक निश्चितपणा आणण्यासाठी, सरकार निर्बंध घालत असे. शिवचरित्रसाहित्य खंड ४ मध्ये अशा निर्बंधांचे एक पत्र आले आहे. प्रस्तुत विभागातही अशाच नमुन्याचे एक पत्र आहे (सं. द., प. १८०८/३).

—ग. ह. खरे

Deo Family of Chinchwad

Moraya Gosavi, the known founder of this family, had, as the tradition goes, a long life of 186 year (A. D. 1375–1561). The family started as that of a mendicant, but soon the members in successive generations took to family life, amassed wealth and occasionally dabbled in administrative matters. The government of the day imposed restrictions and made definitive rules relating to their privileges and various other rights. A letter appearing in this section illustrates this point.


– १२ –

प. द., प. १०८९/३
सु. १०२९ रबिलाखर १७

श. १५५० मार्गशीर्ष व. २
इ. १६२८ डिसें. ४

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी अस्पष्ट वाटोळा शिक्का; २. पत्राच्या सुरुवातीस पहिल्या ओळीनंतर डाव्या बाजूस फारसीतील वाटोळा शिक्का; ३. पत्राच्या शेवटी ' मोर्तब ' शिक्का.)

अज रख्तखाने राजेश्री शाहाजी राजे दामदौलतहू बजानेब कारकुनानी पा। पुणे बिदानद सु॥ तिसा इशरीन अलफ मुतालिक मोरोवा गोसावी हुजूर येऊन माळूम केले जे गोसावी मा॥ इनाम गांवगाना आहे ये बाबे साहेबांची खुर्दखते सादर असेत आणि गांवगाना मुकासायांचे हुदेदार रंजीस करिताती दुमाले करीत नाही दरीबाब निघा होये म्हणौन तरी यांचा इनाम बा॥ खुर्दखते रा॥ इा॥ सालाबाद तसरुफातीप्रमाणे चालवणे इनामतीची मुकासायांची निसबती नाही त्यांस इनामतीखेरीज करून मुकासे दिधले असेत जे कोणही लाइनी इस्कील करतील त्यास ताकीद करून यांचा इनाम यांचे दुमाले करवणे व यांचे इनामतीमधून जे गांवीचे मुकासाई उचापती केली असेल ते त्याकरवे फिराऊन देवणे मौजे ताथवडे व मौजे भिवरी व मौजे बोपेगाऊ व चिचोली ना किणही इतके गांवीचे मुकासाई इस्कील करिताती म्हणौन तरी त्यास लाइनी



पत्र क्र. १२ – शहाजीचे पत्र (४ डिसें. १६२८)

इस्कील करूं न देणे सालाबादप्रमाणे चालवणे इनामतीस व मुकासायांस काही निसबती नाही [* नि.] मोर्तब

रुजू सुरुनिवीस

तेरीख १७ माहे रबिलाखर
रबिलाखर

सुरू शुद

(टीप :- इनामदारांकडून, विशेषत: चिंचवड संस्थानच्या इनामदारांकडून न्यायतः कोणत्याही प्रकारचा वसूल घ्यावयाचा नसताना मोकाशांनी तो बळजबरीने घेतला; तरी तो परत करावा व पुनः तसा घेऊ नये अशाविषयी शहाजीचे हे ताकीदपत्र आहे.)

■ ■ ■

– १३ –

प. द., प. १०९१/३
सु. १०३७ रबिलावल १६

श. १५५८ श्रावण व. २
इ. १६३६ ऑगस्ट ८

(पत्राच्या आरंभी अस्पष्ट वाटोळा शिक्का)

अज रखत्वाने राजश्री स्याहाजी राजे दामदौलतहू वजानेव कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी पाा पुणे बिदानद सुाा सबा सलासीन अलफ राा मोरोब गोसावी सोा मौजे चिचवड पाा माा हुजूर मालूम केले जे अपणास इनाम अजरामऱ्हामती देणे शारकसखान मुकासाई मौजे पिंपरी नाा राहाटणी पाा माा बाा खुाा छ ९ साबान दरसाल सन सबा इसरीन अलफ जमीन चावर नीम ·।।· गजशराइनी सेत मोरजाबुल टिके येकून कदीम रकम खडी २८. पैकी सोडी सालाबाद ·।· बाकी हाली रकम खडी १।।। पाउणीदोनी खडी देखील नख्तयाती व महसूल बाजे बाब ताा देहाये व ताा ठाणे व पायेपोसी व खर्चपटी कुलबाब कुलकानू व वेठीबेगारी व फर्मासी बाब महसुलेसी दिधले तेणेप्रमाणे ताा सन समान तसरुफाती जालियावरी सन तिसा इसरिनामधे पाा मजकूर साहेबास मुकासा अर्जा [नी] जाला होता ते वख्तीही खुाा छ ७ मोहरम मऱ्हामती केले यावरून चालिले आहे यावरी अफतफितरतीकरिता विलायती खराब जाली मौजे मजकूरही खराब पडले सेत तमाम जगल बेबान होउनू काटवण वाढले सदरहू इनामतीचे सेत किर्दी करावया जाता चोराचा उपद्रो होतो बैल व सेतकरी याची पाघुरणे नेताती तरी साहेबी नजर अनायेत फर्माउनू सदरहू सेतीचा मुबादला गावानजीक सेत दिधले पाहिजे खंडी १।।।·

गारपाटीपैकी
पाटी १ यो॥ खडी
१८२॥·

गाढवलोली
पैकी मण
·॥२॥·

सदरहू मुबादला दिधले पाहिजे दरीबाब खुर्दखत होये म्हणौउनू तरी यास सेत मोरजाबुल टिके कदीम रकम खडी २८ पैकी सोडी सालाबाद ·।· बाकी खडी हाली रकम खडी १॥।· याचा मुबादला गारपाटीपैकी पाटी १ यो॥ खडी १८२॥· व गाढवलोलीपैकी मण ·॥२॥· दिधले असे भोगवटा व तसरुफाती सालाबाद बा॥ खु॥ शरकसखान व खु॥ रा॥ इ॥ तसरुफाती जाली असेल तेणेप्रमाणे सदरहू मुबादला सेत चालवणे तालीक लेहोनू घेउनू असली परतोनू देणे हरसाल खुर्दखताचा उजूर न करणे सदरहू सेतास हदमहदूद घाळुनू देणे [* नि.] मोर्तब

तेरीख १६ माहे रबिलौवल
रबिलावल

■ ■ ■

– १४ –

प. द., प. १०८५/३
मु. १०५५ रबिलावल २२

श. १५७६ पौष व. ९
इ. १६५५ जाने. २१

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी वाटोळा अस्पष्ट शिक्का; २. सुरुवातीच्या दोन ओळींनंतर डाव्या बाजूस फारसीतील वाटोळा शिक्का.)

अज रख्तखाने माहाराज राजेश्री शाहाजी राजे दामदौलतहू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी पा॥ सुपे बिदानद सु॥ खमस खमसैन अलफ राजेश्री मोरोबा गोसावी सो॥ चिंचवड पा॥ पुणे याचे बाबे रघुनाथभट खेडकर येही हुजूर येउनू माळूम केले जे गोसावी यास इनाम पा॥ मा॥ बा॥ फर्मान व खुर्दखते वजिरानी व बा॥ खुर्दखते रख्तखाना गहदम सालाबाद ता॥ सालगु॥ कुलबाब कुलकानू दुमाले चालत असता सालमाराकारणे कारकून नवी जिकीर करून गोसावियाचे इनामावरी कनकगिरीपटी नवी बाब जाली आहे ते घाळुनू पैकियाची तहसील लाविली आहे व आणिली नविया पटिया जालिया आहेती त्याही घाळुनू घेउनू म्हणताती तरी ये बाबे माहाराजे ताकीद खुर्दखत मऱ्हामती करून कनकगिरीपटीची व आणिक नवे पटियाची तसवीस न लगे व उसापती केली असेली ते फिराउनू देती येसा हुकूम केला पाहिजे म्हणौनू माळूम केले तरी गोसावियाचे इनाम कुलबाब कुलकानू ता॥ सालगुदस्ता बा॥ सनद दुमाले

असता सालमा। कनकगिरीपटी घाळुनू त्यास तहसील लावणे व आणिखी नविया पटिया घाळुनू घेउनू म्हणणे हे तुम्हास कोणे फर्माविले आहे यावरून तुमचे कारकुनीची बूज जाहीर जाली आता खुर्दखत पावताच याचे इनामावरील कनकगिरीपटी घेतली असेली ते व आणिखी नविया पटिया काहीं घातलिया असतील तरी त्या दुरी करणे काही उचापती केली असेली तरी ते जराबजरा फिराउनू देवणे त्याचा येक रुका ठेविलियाव-(त) री साहेब तुमची नुरी न ठेवीत पेस्तर हरयेक बाव येकजरा याचे इनामाचे वाटे नव जाणे सालाबाद चालिलेप्रमाणे चालवणे तालीक घेउनू असल खुर्दखत फिराउनू देणे पेस्तर फिर्यादी येऊ न देणे पा। खा। जैनाखान पीरजादे बा। परवानगी रोखा मोर्तब

रुजू सुरुनिवीस

तेरीख २२ रबिलावल माहे रबिलवल

(**टीप** – शहाजीला, तुरुंगातून सोडल्यावर सुमारे पाच वर्षांनी, कनकगिरीचा पाळेगार उडचप्प नायक यास जिंकण्यासाठी विजापूरकरांनी पाठविले. त्यावेळी विजापूरकरांनी शहाजीबरोबर त्याच्या नेहमी विरोधात असलेला अफजलखान यास पाठविले. शहाजीबरोबर त्याचा थोरला मुलगा संभाजी हाही गेला होता. कनकगिरीच्या वेढयात तो मारला गेला. शहाजीचा या स्वारीत पुष्कळ पैसा खर्च झाला. त्यामुळे त्याने आपल्या जहागिरीतील गावांवर तो युद्धखर्च भागविण्यासाठी 'कनकगिरी पट्टी' नावाचा कर बसविला. याचा गैरफायदा घेऊन शहाजीच्या अधिकाऱ्यांनी कनकगिरी पट्टीखेरीज आणखीही नवे कर बसवून ते वसूल करण्याचा प्रयत्न चालविला होता. या पत्राने शहाजीने त्याना ताकीद दिली आहे की चिंचवडच्या मोरोबा गोसावी यांच्या इनामावर कनकगिरी पट्टीसह वरील प्रकारचे कोणतेही कर घेऊ नयेत, घेतले असल्यास ते परत करावेत. ह्या कनकगिरी पट्टीचा उल्लेख इतरही अनेक पत्रांत आला आहे.)

■ ■ ■

– १५ –

प. द., प. १५७७ श. १५७७ भाद्रपद शु. १०

सु. १०५६ जिल्काद ९ इ. १६५५ ऑगस्ट ३१

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी शिवाजीची अष्टकोनी 'प्रतिपच्चंद्र' मुद्रा; २. सुरुवातीच्या दोन ओळींनंतर डाव्या बाजूस सामराज 'मतिमत' प्रधानाचा वाटोळा शिक्का; ३. पत्राच्या अखेरीस 'मर्यादा' शिक्का.)

राजश्री मोरोबा गोसावी

अज रख्तखाने राजेश्री सिवाजीराजे साहेब दामदौलतहू बजानेब कारकुनानि व कमाविसदारानि व पथकी पाणसारेयानि हाल व इस्तकबाल वितपसील मा। हाये

कारकून		कमाविसदार व पाणसारे
ता। हाये ऊर्फ पौड	ता। मुठे खोरे	घाट तेलवैला घाट कुंभा
ता। खडकवासले	ता। मोसे खोरे	व गाढवलोट व फावला
ता। माण	पा। चाकण	माहाल चिंचोली माहाल इंदोरी

बिदानद सु॥ सीत खमसैन अलफ राजेश्री [* मो. जा.] याची खासगत कोठीचे बैल गला आणावयासी मावलात व कोकणात पाठवीत असताती तरी इकडून गला अगर वस्तभाव कोकणात व मावलात नेतील व तिकडूनही जे काही आणितील त्यासी जकाती व विस्वा सरदेसमुख व देसमुख व हक पाणसारे व हरएक बाब थलमोडी व थलभरीत काही ने घेणे राजेश्री [* मो. जा.] चे कोठीस हरयेक बाब येक जरेयाची तोसीस न देणे तुम्ही तालीक लेहोनू घेउनू असल खुर्दखत राजेश्री [* मो. जा] मुतालिकापासी परतोनू देणे दर हरसाल ताजे खुर्दखताचा उजूर न करणे दर हरसाल सदरहूप्रमाणे चालवीत जाणे

तेरीख ९

जिलकादी

(टीप : चिंचवडचे मठाधिपती मोरया गोसावी यांजविषयी शिवाजीमहाराजांच्या मनात आदरभाव होता. म्हणून मठाधिपतींचे जे बैल त्यांना लागणारे जिन्नस आणण्यासाठी कोकण व मावळ या भागात जातील व तिकडून येतील त्यांवर कोणत्याही प्रकारची जकात वगैरे घेऊ नये अशी आज्ञा या पत्रात संबंधित अधिकाऱ्यांना शिवाजीमहाराजांनी दिली आहे.)


■ ■ ■

– १६ –

प. द., प. १५७८
सु. १०५७ जिल्हेज

श. १५७८ आश्विन–कार्तिक
इ. १६५६ सप्टें.–ऑक्टो.

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी शिवाजीची अष्टकोनी ' प्रतिपच्चंद्र ' मुद्रा; २. सुरुवातीच्या दोन ओळींनंतर डावीकडे वाटोळा अस्पष्ट शिक्का; ३. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)



पत्र क्र. १५ – शिवाजीचे पत्र (३१ ऑगस्ट १६५५)

अज रख्तखाने राजेश्री सिवाजीराजे साहेब दामदौलतहू बजानेबू कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसमुखानी पाा पुणा विदानद सुाा सबा खमसैन अलफ बोा विसाजी राम हुजूर मालूम केले यैसे जे [* मो. जा.] [* फा. आ.] मौजे चिंचवड पाा मजकूर यासी इनाम [* फा. आ.] मजकुरी आहे विताा

मौजे चिचवड जमीन विताा
जिराती बागाईत टके
नख्त टके गला खंडी ५०
३० १॥

मौजे ताथवडे जमीन
कास रुके ।१६ येकूण
चावर येक
१

मौजे आकुलवडी जमीन
कास गला मण ।॥।
येकूण रुके
८३

मौजे मुडखल जमीन
कास रुके ।।
मौजे वाकड जमीन
चावर येक १
मौजे बोपगाऊ दरोज
नख्तपैकी रुके दोनी
८२

मौजे भिवरी दरोज
नख्तपैकी रुके ८२

मौजे चिचोली
जमीन चा
वर येक
१

मौजे पिपरी राहाटणी
जिराती का
स खंडी १॥।
येाा चावर नीम
।॥।

मौजे राहाटणी बाा
कुरण नख्त टके
७ ।॥।

मौजे पिपले सौदागर
जमीन चावर येक १
मौजे नेरे जमीन कास
रुकें ८६
कसबा पाा मजकूर
पैकी रोजीना दरमा
हाल जकातीपैकी
नख्त रुकें
बारा
।।

नाा किन्ही
रोजमुरा द
रोज नख्तपै
की रुके बा
रा ।।

बाग जमी
न मण दा
हा ।॥।

तेल वजन
येक सेर
८८१

सदरहूप्रमाणे याचा इनाम आहे यासी माहाली कारकून ताज्या खुर्दखताचा उजूर करताती म्हणौनू इलतमेसी केंली [बरा] ये इलत [मेसी] खातिरेसी आ [णौनू] श्रीचा इनाम पाा मजकुरी आहे [भोगव] टा तसुरफाती ताा सालगुाा चालत आली असेल तेणेप्रमाणे कुलबाब कुलकानू देखील ठाणेबाबा हाल व इस्तकबाल दुमाले केले असे दुमाले करणे माहालास हरयेक येकदर खुर्दखत इनामतीचे बाबें इस्किलीचे सादर

ज-ही जाले त-ही श्रीच्या इनामास येक जरा इस्कील न करणें दर हरसाल ताज्या खुर्द-खताचा उजूर न करणे तालीक लेहोन घेउनू असेली खुर्दखत फिराऊन देणे मोर्तब सुद

रुजू सुरुनिवीस

तेरीख * * *
जिल्हेज

(**टीप :** या पत्रात एक महत्त्वाचा मुद्दा आला आहे. तो म्हणजे, इनामाबाबत एखादी तहकुबीची (इस्किलीची) आज्ञा आली तरी मोरया गोसावी यांच्या इनामाबाबत त्या आज्ञेचा अंमल करू नये.)

■ ■ ■

– १७ –

प. द., प. १५८०
सु. १०५९ रबिलावल १३

श. १५८० मार्गशीर्ष शु. १५
इ. १६५८ नोव्हें. २९

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी शिवाजीची अष्टकोनी 'प्रतिपच्चंद्र' मुद्रा; २. सुरुवातीच्या दोन ओळींनंतर डावीकडे सामराज 'मतिमत' प्रधानाचा वाटोळा शिक्का; ३. मूळ पत्राचा पहिला निम्मा कागदच उपलब्ध आहे.)

अज रख्तखाने राजेश्री सिवाजीराजे साहेब दामदौलतहू बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देसमुखानि पाा पुणा बिदानद सुाा तिसा खमसैन अलफ राजेश्री [* मो. जा.] गोसावी मुाा चिचवड यासि चिचवडानजीक हमशाही गाव आहेती तेथील रयेती हरसाल गवत काढून देत असताती म्हणोनू हुजूर मालूम जाले तरी साल मााापासुनू साहेबी हुजरून तह गैसा केला आहे की राजेश्री [* मो. जा.] गोसावी यासि पाा माहून हरसाल गवत ५०००० पनास हजार काढून देववावे तरी चिचवडानजीक भवताले [* अपूर्ण]

तेरीख १३ माहे रबिलावल
रबिलावल

सुरू सुद

(**टीप :** मोरया गोसावी यांच्या मठाला चिंचवडजवळच्या गावांतून काहीं गवत मिळत असे. ते नेमके किती असावे यावर पूर्वी निर्बंध नव्हता. या पत्राने तो ५०,००० पेंढया असा निश्चित केला आहे.)

■ ■ ■

– १८ –

प. द., प. १५९३ — श. १५९४ वैशाख व. ८
सु १०७२ मोहरम २२ — इ. १६७२ मे १०

(१. पत्राच्या सुरुवातीच्या दोन ओळींनंतर डावीकडे मोरेश्वर त्रिंबकाचा पिंपळपानी शिक्का; २. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का)

श्रीमोरेश्वर

मशहुरल हजरत राजेश्री विसाजी बलाल सुबेदार माहालहाये प्रती राजश्री शिवाजीराजे दंडवत शुहूर सन इसने सबैन व अलफ बदल इनाम राजश्री मोरोबा गोसांवीं देवस्तान श्री [* मो. जा.] यासि हासिल कसबे पेडगाऊपैकी दररोज रुके ८६ सा नख्त व तेल वजन टकबंदी ८८१ येक सेर सालाबाद माहातकदम बा। सनद मलिक अंबरपासून ता। सालगु॥ चालत आले असे तेणेप्रमाणे देविले असे हासिल कसबे मजकूरपैकी सदरहूप्रमाणे मवाफिक सालाबाद रोजबरोज आदा करीत जाणे हरसाला ताजा सनदेचा उजूर न करिता याचवरून साल दरसाल चालवणे तालीक लिहून घेउनू असल परतोनू देणे छ २२ मोहरम पा। हुजूर

सुरू सुद

■ ■ ■

– १९ –

प. द., प. १५९५ — श. १५९६ ज्येष्ठ शु. ४
सु. १०७४ रबिलाखर १२ — इ. १६७४ जुलै ७

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी शिवाजीची अष्टकोनी ' प्रतिपच्चंद्र ' मुद्रा २. सुरुवातीच्या दोन ओळींनंतर डावीकडे महादेव ' मतिमत ' प्रधानाचा शिक्का; ३. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

श्री

कौलनामा अज रखतखाने राजश्री शिवाजीराजे साहेब दवामदौलतहू ताहा मोकदमानी व रयानी मौजे चिंचवड पा। पुणा बिदी (दा) नद के शुहूर सन अर्बा सबैन व अलफ दादे कौलनामा ऐसा जे तुमचा मुदा जाहीर जाला की मोगलाची आमदनी

होते तसवीस लागते याकरितां गावावरी राहवत नाही जरी साहेबांचा हुकूम होईल तरी मोगलाकडे साजीस करून कौल घेऊन गावास अजार लागेना ऐसे करून राहोनू म्हणून त्यावरून कौल मरहमत केला असे मोगलाकडे साजीस कराल ते भले माणूस मव्वसर दरम्याने घाळून त्याचे हातें कौल घेणे कीं काडीचा अजार लागेना ऐसे घटी करून मग सुपे गांवावरी राहणे जरी मोगलाचा कौल पुरता नसेली आणि गांवांवरी राहाल सेवट मोगल येऊन अजार देतील बंद धरून नेतील तरी गावावरी राहावया साहेबांचा कौल नाही ऐसे जाणून ज्याकरितां मोगलांपासून दगा नव्हे ते करणे कौल असे व आपल्या लोकाकडून तुम्हास काही अजार लागणार नाही ये बाबे पा मारचे कारकुनास लिहिले असे परवानगी हुजूर

तेरीख १२
रबिलाखर

सुरू सुद

(टीप : या पत्रात शिवाजीने चिंचवडच्या लोकांस असे आश्वासन दिले आहे की, ' माझ्या लोकांकडून तुम्हाला कोणताही त्रास होणार नाही. तथापि तुम्ही तो त्रास मोगलांकडून होऊ नये म्हणून सुप्याच्या बाजूस स्थलांतरित झालात तर तेथेही मोगलांचा त्रास होण्याची शक्यता आहे. तरी तुम्ही एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीस मध्यस्थी घालावे आणि त्याजकरवी मोगलांचे अभयपत्र घ्यावे. '

हे सुपे म्हणजे मोरगाव परिसरातले सुपे होय.

राज्याभिषेकानंतर लवकरच लिहिलेले हे पत्र आहे. त्यावेळी चिंचवडच्या परिसराला मोगलांचा धोका होता असे दिसते.)

■ ■ ■

– २० –

सं. द., प. १८११/३
रा. ७ ज्येष्ठ व. २

श. १६०२ ज्येष्ठ व. २
इ. १६८० जून ४

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी कोणतीही राजमुद्रा नाही; २. सुरुवातीच्या तीन ओळींनंतर डावीकडे शिक्क्यासाठी मोकळी जागा ठेवली आहे. तेथे कोणताही शिक्का नाही; ३. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ७ रौद्र सवत्सरे जेस्ट बहुल द्वितीया भृगुवासरे क्षत्रियकुलावतस श्रीराजा शंभुछत्रपति याणी राजश्री माहादाजी सामराज देशाधिकारी

ता। मावळे यासी आज्ञा केली यैसी जे श्री [* मो. जा.] स्वामी चिंचवड यासी प्रतिवर्षी धान्य व तूप व पेंडी रसा। करून द्यावयाची नियेत तीर्थस्वरूप कैलासवासी स्वामीने करून दिल्ही असे तेणेंप्रमाणे चालतें तैसे याउपरीही चालवणें रसा। करून देवीत जाणे नवे खलल काही न करणे [* नि] लेखनालंकार

रुजू सुरुनिवीस

सुरू सुद

■ ■ ■

– २१ –

प. द., प. १५४०/३ श. १६०३ चैत्र व. २
रा. ७ चैत्र व. २ इ. १६८१ मार्च २५
(* शुक्रवार)

(१. पत्राच्या सुरुवातीच्या तीन ओळींनंतर डाव्या बाजूस नीळकंठ मोरेश्वर मुख्य प्रधान याचा वाटोळा शिक्का; २. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ७ दुर्मती संवत्सरे चैत्र बहुल द्वितीया भृगुवासरे क्षत्रियकुलावंतस सिंहीसनाधीश्वर श्रीराजा शंभू छत्रपति स्वामी यांणी संभाजी बापूजी पारपत्यगार ता। सुपें यासि आज्ञा केली ऐसी जे श्री [*मो. जा.] देव चिंचवड यांचे इनाम ता। सालगुदस्तां कैलासवासी [* मो. जा.] स्वामीचे वेलेस चालत आले आहेती तेणेप्रा। पेस्तरही चालवणें हरसाल ताजा सनदेचा उजूर करीत नव जणें [* नि.] लेखनालकार

रुजू सुरुनिवीस

सुरू सुद

■ ■ ■

– २२ –

प. द., प. १७६५/३ श. १६१६ भाद्रपद शु. २
रा. २१ भाद्रपद शु. २ इ. १६९४ ऑगस्ट १२

(१. पत्राच्या सुरुवातीच्या तीन ओळींनंतर डाव्या बाजूस नीळकंठ मोरेश्वर मुख्य प्रधान याचा वाटोळा शिक्का; २. या शिक्क्याच्या शेजारी प्रल्हाद निराजी याची अष्टकोनी मुद्रा; ३. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २१ भाव सवसरे भाद्रपद सुध द्वितीया रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणी हवालदार व कारकून [* मो. जा.] मावल यास आज्ञा केली येसी जे राजश्री मोरोबा गोसावी चिंचवडकर यांणी शामभट ब्राह्मण हुजूर पाठविला त्यांणें येऊन चंजीचे मुकामी विनती केली कीं मोरोबा गोसावी चिंचवडकर यास मौजें पोहुरे पा मार पैकीं इनाम भात बारीक खंडी १ येक सालीना चालत आले आहे पुढेही उतरोतर चालवावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणून विदीत जाले त्यावरून राजश्री मोरोबा गोसावी थोर सत्पात्र देवीकृपाही याचें ठांई आहे यांचे चालवणें स्वामीस अगत्य याकरितां हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असे तरी सालीना येक खंडी भात बारीक इनाम चालत आले ते मनास आणून पूर्वीपासून सालगुदस्ता ता भोगवटा चालत आला असेल तेणेप्रमाणे पुढेही उतरोतर वौशपरंपरेनें [* नि.] चालवणें जाणिजे [* नि.] निदेश समक्ष

संमत मंत्री समत सुमंत रुजू
सुरू सुद बार बार बार

■ ■ ■

– २३ –


प. द., प. १६१८
सु. १०९७ सफर ४

श. १६१८ भाद्रपद शु. ६
इ. १६९६ ऑगस्ट २३

(१. पत्राच्या सुरुवातीच्या तीन ओळींनंतर श्रीकराचार्य यांचा वाटोळा शिक्का; २. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का; ३. पत्राच्या शेवटी मारलेला शेरा असा : वो रघुनाथभट याचे पुत्र नीलकठ भट)

श्री शिवराज

श्री सकलगुणालंकरण अखंडित ल [क्षुमी] अलंकृत राजमान्य राजश्री देशाधिकारी व ले [खक वर्तमा] न भावी प्रा मावले गोसावीं यासि पौ श्रीकराचार्य पंडित-



पत्र क्र. २२ – राजारामाचे पत्र (१२ ऑगस्ट १६९४)

राऊ आसीर्वाद सु॥ सबा तिसैन अलफ धात्रु नाम संवछर भाद्रपद शुध षष्टी भानुवासरे वेदमूर्ति रघुनाथभट यांचे पुत्र नीलकंठभट सिवणेकर काशप गोत्र अश्वलायेन सूत्र वास्तव्य स्थल चिंचवड याणी चंदीच्या मुकामी समीप येऊन श्रुत केले की आपणास धर्मादाऊ प्रति वरुषी तांदूल कैली कोठी मापे

वारीक तांदूल खंडी	मोठे तांदूल खंडी
२	१

येकून खंडी ३ तीन रास राजश्री कैलासवासी स्वामीचे वेलेस येणेप्रा॥ चालत होते त्यानतर राजश्री [* मो. जा.] दाजी याचे वेलेपासून भोगवटा तुटला आहे तरी स्वामीनी कृपाळू होऊन सदरहू धर्मादाऊ जीर्णोधार करून देविला पाहिजे म्हणऊन विदीत केलें त्यावरून मनास आणितां ब्राह्मण थोर सत्पात्र वेदशास्त्रसंपन्न कर्मनिष्ट यैसे जाणौन सदरहू धर्मादाऊ प्रतिवरुषी तांदूल कैली कोठी खंडी मापें बारीक २ व मोठें १ ये ३ तीन रास देविले असेती तरी रा॥ [* मो. जा.] दाजी यांचे वेलेस भोगवटा चालला नाही त्यावरी नव जाणे भट गोसांवी क्षेम आहेती तोंवरी सदरहू धर्मादाऊ सुरक्षित चालवणें प्रति वरुषीं नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रति लेहून घेऊन मुख्य पत्र परतोन देणे जाणिजे छ ४ माहे सफर [* नि.] हे विज्ञप्ति

वार सुद

(**टीप :** येथे ‘ दाजी ’ हा शब्द छत्रपति संभाजीस उद्देशून लावला आहे.)

■ ■ ■

— २४ —

सं. द., प. १८०८/३
रा. २९ कार्तिक शु. ९

श. १६२४ कार्तिक शु. ९
इ. १७०२ ऑक्टो. १८

(१. सुरुवातीच्या पहिल्या तीन ओळींनंतर डावीकडे प्रथम नीलकंठ मोरेश्वर प्रधान याचा पिंपळपानी शिक्का; २. त्याला लागून उजव्या बाजूस ‘ श्री आई आदि पुरुष श्रीराजा शिवछत्रपति स्वामी कृपानिधि ॥ तस्य परशराम पंत प्रतिनिधि ’ अशी अष्टकोनी मुद्रा; ३. पत्राच्या शेवटी ‘ मर्यादा ’ शिक्का.)

श्री

श्रीदेव

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक २९ चित्रभानु संवत्सरे कार्तिक शुध नवमी रविवासर क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत मावले यासि आज्ञा केली ऐसी जे श्री [* मो. जा.] वास्तव्य चिंचवड यांचेथें श्री [* मो. जा.] प्रीत्यर्थ अन्नाचा व्यये बहुत आहे त्यास धान्य व वरकड जिनस लागतात त्यामधें नाने मावल व पोन मावल या माहालपैकी राजश्री थोरले कैलासवासी [* मो. जा.] स्वामींनी मोईन करून दिल्ही आहे वि॥

The present gift-deed was made by Sambhaji after he finally attained the state power at the end of various difficulties and hurdles. The gift was made to a Brahman, Mahashaya of Kudal in Konkan at the time of pilgrimage to Shambhu Mahadeo of Shinganapur, the family-deity of the Bhosales.

The present *Danapatra* contains some interesting references : Shivaji's father, Shahaji, is described as one who resuscitated the Haindava Dharma, and Sambhaji's step-mother, Soyarabai, is described as being under the evil influence of Shivaji's wicked ministers, who were against Sambhaji's coming to the power.

——


पोतदार संग्रह
रा. ७ भाद्रपद शु. १३
सु. १०८१ सावान ११

श. १६०२ भाद्रपद शु. १३
इ. १६८० ऑगस्ट २७

(१. पत्राच्या आरंभीच्या सहा ओळींनंतर मध्यभागी १६ बुरजी पिंपळपानी शिक्का : ' श्री । शंभोः शिव । जातस्यमुद्राद्यौ । रिव राजते ॥ यदं । क सेविनो लेखा । वर्तते कस्य नो । परि ')

॥ नमस्तुंगशिरश्चुंबिचंद्रचामरचारवे ॥
॥ त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभायशंभवे ॥
॥ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति ॥
॥ द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं ॥
॥ एकं नित्यं विमलमचळं सर्वदा साक्षिभू ॥
॥ तं भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥
·॥ मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥·
॥ छत्रपतेः यदत्रोपरिलेखितं ॥ छं ॥ श्री ॥· [1]

०॥र्दं स्वतिश्रीमद्रत्नखचितमहार्हमाणिक्यमंडित हेममयमुख्य
स्तंभोपशोभितसुवर्णरज्जुराजिरंजितहरिन्मणिहीरककांतिछटानीराजित हैर-
ण्यराजततंतुविहित वस्त्रविस्तारविस्तृत मारकतपताकापंक्तिपरिष्कृत समा-
रूढसुरव्यूहपुरोभागसंगीतशास्त्रानुसारिगंधर्वसिद्धकिन्नरसाध्याप्सरोगणकंठमा-
धुर्यभंगीसंगतसमारचितगानानुकूळीकृत मनोहरतरललितसत्तालजांबूनद
विनिर्मित विविधजलयानजालालंकृतभूरिस्वर्णभारभासुरभूमीधरसमुदायभास-
मानसुधासिंधुमध्यवर्तित्रैलोक्यचक्रवर्तिकविकुळवाग्वैखरीवर्णनीयप्रधानवस्तु
प्राधान्यांतरवर्तिप्रतिदिवसप्रोत्फुल्लबकुळकुरवकाकीर्णचंपकाशोककुटजकल्हार
नागपुन्नागमल्लिकामालतीकेतकीजातिवेलैलावल्लिवल्लिततताळतमाळहिंताळना-
रीकेळक्रमुकदाडिमीजंबुनिंबुजंबीरबीजपूरापूरितपारिजातराजिराजित लवली
लंघित माधवीमिळनमुग्धमुकुलितरसाळमंजुळमंजरीसमास्वादनंमत्तकोकिळक-
लकंठसमारब्धसंयोगिहृदयाह्लादकमुक्तिमानिनीमानध्वंसकनिर्वासित समस्तदु-
र्वासनाबीजहार्धरेखात्मकबीजजीवातुकावाङ्मनसगोचरनानापुष्पजातिपरि-
भ्रमणप्राप्तपरभागमधूकद्राक्षामंडपांतर्गतपुष्पंधयझांकारारावरावित चंदनादि-
माननिंदित नंदनोद्यानपाटित चैत्ररथप्रमाणभक्तजनप्राणशुकसारिकाशब्दसा-
रसक्रें कारकृतकांदिशीकमहामहापातकिसंघातसमाश्वासनपूर्वकसमाधानघ्राण-
महोद्यानमाळामनोज्ञसप्तद्वीपभावनाभाव्यमानान्यतमद्वीपदेदीप्यमानसमुद्रांत-
र्निष्कांतरत्नानुविद्धानंतपरिखापरिक्रांत सुरव्यूहव्यापृत गोपुरप्रांतशांतीकृत
संसारपरिभ्रमणश्रांतसमावेशित शांतदांतनिजांतर्गत भक्तजनभोषित कृतां-


॥ मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥
॥ छत्रपतेः पदत्रोपरि लेखितं ॥ श्री ॥

०॥६

स्वस्तिश्रीमद्रत्नखचितमहार्हमाणिक्यमंडि
तहेममयमुख्यस्तंभोपशोभितसुवर्णनिर्मितराजिरंजित
हरिन्मणिहीरककांतिछटानीराजितहेमएयराजततं
वितहितवस्त्रविस्ताराविस्फुरन्मानकेतुपताकापंक्ति
परिष्कृतसमारूढसुनक्षत्रपुंजोलागसंगीतशास्त्रानु
सारिगंधर्वसिद्धकिन्नरसाध्याप्सरोगणकंठमाधुर्य
चंगीसंगतसमानर्चितगानानुकूलीकृतमनोहर
तरललितसत्तालजांबूनदविनिर्मितविविधज
लयानजालालंकृतभूमिस्वर्णाचारुभासुरभूमी
धरसमुदायसभासमानसुधासिंधुमध्यवर्तित्रिलो
क्यचक्रवर्तिकाविकुलवागेश्वरीवर्णनीयप्रधा
नवस्तुप्राधान्यांतवर्तिप्रतिदिवसप्रोत्फुल्लबकुल
कुरबकाकीर्णचंपकाशोककुटजकल्हारनाग
पुन्नागमल्लिकामालतीकेतकीजातिवेलेलावल्लिव
ल्लिततालकतमालहिंतालनारीकेलक्रमुकदाडिमीजं
बुनिंबुजंबीरबीजपूरनारंगितपारिजातराजिराजि
तलवलीलंघितमाधवीमिलनमुग्धमुकुलितर
साळमंजुळमंजरीसमास्वादनमत्तकोकिलकल
कंठसमानबद्धसंयोगिहृदयाल्हादकमुक्तिमानिनीमा
नध्वंसकानिर्वासितसमस्तदुर्वासनाबीजहाधविबा

पत्र क्र. ३९ – संभाजीचे दानपत्र (२७ ऑगस्ट १६८०)

तानर्घ्यमौक्तिकमालिकाजाळलंबितवितानसंतानशोभायमानमृदुत्तरास्तरणानुषक्तदेवयानोचित बहुविधविमानवेदिकाविभ्राजमानवहळागरुगुग्गुळाद्यष्टांगधूपघमघमायमानकनकप्राकारहृदयानुकारसंसारसारसंपूर्णविबुधमंडलीमंडितांजळियोगानुध्येयद्वाःस्थीकृतांगनाजनगौरवतर्जनीतर्जनमात्रविषयीकृतविष्णुविरिंचिप्रमुखदेवाधिदेवसर्वदेवतासार्वभौमधामधामीभूत मंजुमणिमंदिरांतर्गतयवांकुरराजित ब्रह्मादिपंचमंचकात्मकत्रिदशोपासित मकरंदसंदोहामोदितादभ्रास्तरणोपधानहंसगुलिदलिमसमासक्तपर्यंकांचित कमनीयकामेश्वरांकस्थित सस्मेरमुखाकृतिनिराकृतेषदुन्मिषितारक्तारविंदद्युतिनिसर्गकज्जळितलोचनलावण्यविनिंदित नीळोत्पळरुचिररुचिविजितपरिपक्वदाडिमीबीजवर्णवैभवदंतोद्योतनिपतनसंप्राप्तपरभागारुणवसनकंचुकीरचनसमुद्गीर्णलौहित्यसंवळितांगारुणिममहिमलोहिततमलोहितमणिमाळातिरोहित मुक्ताहीरकेंद्रनीळहारानुप्रकटित निजप्रवाहांतर्हितजान्हवीकलिंदजासलिलकल्लोलप्रत्यक्षप्रकाश्यमान स्वरूपवत्सरस्वत्युपसेव्यमानकामयमानकामेशप्रारब्धमुखामृतदीधित्यमृतपाननिपतित पीयूषबिंदूयमाननासामौक्तिकसंभ्राजमानवैभातिकसंध्यारागानुरंजितजलदजालजालितारुणोदयकाळीनतरणिमंडलायमानारुणवसनाछादित पद्मरागमयशिरोमंडनमंडनायमानतारुण्यसमयोपचीयमानराजराजेश्वरतरुणिमतपःफळायमानानुपमानकुचकुड्मळोच्छ्रायनमन्मध्यलतिकाभंगभयभीरुविधिवल्तित्रिवलीवलनविद्योतमानशृंगारबीजांकुरकोरकायमानरोमराजिराजितराजराजेश्वरीनिरंतरसन्निधिसुलजिघृक्षुहंसभूषावेषायमानसर्वांतर्यामिहंसपरमहंसोपास्यमानचरणकिंकिणिकारणत्कारव्याजचतुर्वेदोद्भासितबहुविधदेहव्यापारशब्दनिःशब्दप्रकारकलितनिजाधारानुवारध्यामानप्रतिपक्षक्षयिष्णुक्षयापाकरिष्णुदशविधव्यवस्थापितदिव्यदेहावस्थविधृतनखस्वरूपकुमुदसखवियोगासहिष्णुहरितलोहितपीतश्यामळवर्णाक्रांतरत्नजातोजृंभितांगुलीयकछलनक्षत्रसंहतिविस्मृतदेहभावानुभाव्यमानालक्तकरसमिषपतिप्रमपूराभिषेकपरिपूर्यमाणनिजभावनानियमितनिर्द्वंद्वद्वंद्वतिरोभावलीलोल्लासित ललितद्वंद्वभावकामितफळप्रदानविधिविशेषिताहमहमिकापूर्वाभूतपूर्वपंचपल्लवांचितकल्पशाखिशाखप्रतिद्वंद्वांतर्भावललितचरणारविंदद्वंद्वनिदिध्यासाध्यासितत्तादात्म्यभावप्रतिदिवसप्रेमकौतूहळभरप्रारंभित पादुकापूजनसंप्राप्तैकहुंकारपातितनहुषप्रभुभावचुलकितमहोर्मिमाळासंक्षाळितसलिलप्रादुर्भावदर्शनमात्रहृदयानुशयशायितातापिवातापिदुर्दावबंधितविंध्याद्रिनिर्बंधदुर्भावलोपामुद्रापतिप्रभावयोगज्ञानविज्ञानविज्ञात विश्वभावभसितोद्धूलनध्यानप्रबंधपठनरुद्राक्षधारणशिरःकेशानुसारणानुबद्धार्धनारीनटेश्वराविर्भावविभूतिमात्रप्रदानदत्तपरमैश्वर्यप्रसिद्धशुद्धसहजभावानुदिननिबद्धपद्मासनारब्धकामकळास्तोत्रपठनयापितबड्यामशंभुनृपप्रार्थनाविर्भूतभृकुटिवक्रिमचंक्रमणक्रमसंक्रमितनेत्रशोणिमोपशमित-

जगदंबापाशपाशितांकुशाकर्षणत्रासितकतिपय दुर्दांतमहाराष्ट्रोन्मिश्रनिरभ्राभ्रो
द्भासिविद्युद्वल्लिवलनशालिलक्ष्मीमदांधप्रमादमदिरोन्मत्तदुर्मंत्रिमंत्रितछत्रधारण-
सिंहासनाधिरोहणप्रत्यूहीभूताविर्भूतबहळतरकोळाहळकिलिकिलाकलितताति-
क्रूरकठिनसंग्रामोद्योगसंभ्रमोद्भ्रांतभ्नांतग्रामसमुद्रवलयावलितपृथ्वीतलप्रथितप्र-
करणगुरुपरिचर्याचरणसंयातशुद्धांतःकरणशरणशरणैकशरणसकलजनरसना
भरणप्रबलपापक्षयकरणानुस्मरणतापत्रयहरणनित्यपूजनसंभारितनवावरणभा-
वभजनभंजितचैतन्यावरणदुर्दैवदावपीडितपापसंघातसंघटितप्रमोदनघनघनावर-
णनिरतध्याननिर्धौतजन्मजरामरणभवोदधिदुस्तरणोपायनिखिलनिगमस्मृति-
शास्त्रपुराणसंमतसंपादिततरितरणादरणमहाप्रलयकालाकलिताक्षरण.... योगिध-
न्यायमाननामधेयजामदग्न्यागोत्रालंकृतकह्लाटकदेशीयद्विजांतर्गतवाकरोपनाम-
ककुळालंकाररामक्षेत्रमंडळकुंडलायमानकुडालनगरोपाध्यायधौरेयद्विजाग्रग-
ण्यनामनामदेवभट्टात्मजाश्वलायनसूत्रोपबृंहितऋग्वेदांतर्गतशाकलशाखाध्या-
यिसकलमांत्रिकवर्यमहामहानुभावभावितयमनियमासनप्राणायामप्रत्याहार-
ध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठाकनिष्ठीकृतवसिष्ठादिशिष्टमहाशय-
स्वामिभ्यःशिखरस्वामिशंभुमहादेवयात्रासमागमसमागतसमस्तदिग्देशवास्त-
व्यजनसमारचितकर्णारुंतुदसलिलकोलाहल [2] वर्णनानुकर्णनसंयातशिवभक्ति-
भावविकारमनःकल्पिततोयौघतरलिततटाप्रकारसमुज्झितस्वायव्ययप्रायवि-
चारहरिश्चंद्ररंतिदेवानुसारसंकल्पितसंसर्वस्वागारमांधातृसदृशमहोदारप्रथमांत-
र्धनप्रदानकृतनिर्माणप्रारंभनिर्धार विहितैकोत्तरशतसंख्याककुलप्रतिष्ठापूर्वक-
पूर्वपूर्वजसमुध्धारपरीक्षानिमित्तकैलासवासिपरित्याजितपूर्वसेवनोद्योगभवव्या-
पारभावभजितभवनिजामद्वारपरिगृहीतसंपूर्णसांसारिकसमाचारदृढतरसरोवंधन-
छद्मस्वछंदप्राक्कर्मानुबंधनिनवंधसमसम्यगाबद्धवेदशास्त्रपुराणस्मृत्यागमानुमि-
तिसिद्धांतसिद्धांतितभाविपृथ्वीचक्रशक्रायमानांकुरितशाश्वतवैभवसंभरितहे-
षाहर्षिततोयदगर्जनागर्जितसंतर्जितदारिद्र्यप्रचारहयहस्त्यादिसंभारसिंहावलो-
कानुकारविरचितचित्तविचारोत्साहप्रेषितप्रतिवार्षिकद्रव्यसंस्कारसमारचित-
पुष्करपूरोचितपुण्यपुष्कराशयविस्तारसदाशिवस्वरूपसदाशिवभावनाभावितां-
तःकरणसकरुणीकृतगिरीशप्रसादावलोकनस्ववंशांशावतारग्रहणानुग्रहसंतरित
दुस्तारसंसारप्रस्तारसारासारविचारसंचारचतुरशूराग्रण्यदेवब्राह्मणप्रतिपालक-
महीतलप्रख्यातमहत्त्वमालोजिमहीपाळप्रपौत्रेणप्रबळनिजामनृपछत्रपतीराज्यै
कप्रधानीभूतैकरात्रियुद्धहाहाभूतीकृतातिकोदंडकलाकलनप्रचंडतरबहळाराति-
वर्गबंदीकृतदिल्लींद्रवीरवृंदमहामाहात्म्यमूढमलिकाख्यासुरनिदेशनिध्वंससम-
यसमागतसमस्तदेवालयरक्षणक्षणतृणीकृतजीवसंरक्षणक्षात्रधुरंधरोचितपराक्र-

माचरणनिर्वार्यनिर्बंधधारणौद्धत्यनिवारिताखिलानार्यधरांतर्गतागणितगीर्वाण
गणस्थापनप्रसन्नीकृतपार्वतीपतिप्रणयप्रसादैकस्थानमज्जितनिजामक्ष्मापाळ-
कालाव्यवहितोत्तरकालसमायातदुष्कालप्रचुरितचक्रहाहाकारकालव्यालग्र-
सिताबालप्रजाजालकालतत्कालगृहीतकरालकरवालाकालकालीनकालबहलो-
कांतरालोल्लसल्लसत्तडिन्मालमंडलितमंडलमंडलीकुंडलनाकुलीकृततांम्रतुरुष्क-
संकालनसंकलितनिष्कलंकिकल्क्यवतारलीलोल्लासभरभरितांतःकरणपूर्वकत-
द्वंश्यविशिष्टाख्यानख्यापनछत्रधारणदुर्गमहावलीदुर्गग्रहणकारणोद्भटतरर-
णोत्साहोत्सेधकरणदुर्वारवैरिभटोत्कटोत्सारणस्थापितस्वामिधर्माभिमानहतभा-
ग्योद्योगविज्ञातविजातीयविक्रमाविर्भावसंभ्रमितैदिल्लदत्तैश्वर्यसमुदायदेदीप्य-
मानहैंदव-धर्म जीर्णोद्धारणकरणधृतमतिसमुद्धृताद्भुतधृतिधारणानिर्धारित
म्लेछक्षयनिदानकालोचितसेतुराज्यस्वीकारादृतानेकसामंतानुसृतनरपतिप्रधा-
नलीलोल्लसदतिचटुलतुरगावलीटापोल्लेखविसर्पत्क्षितिरजोछलत्क्षोदक्षोभभेरी-
भांकृतिसंक्षोभगजघटाघंटारव — — गर्जनवीरानुसर्जनतर्जनत्वरितप्रयो-
गप्रवीणप्रयुक्ताग्नियंत्रदुर्दिनक्रमपदातिप्रयुक्तकोलाहलक्रमकोपारुणितनेत्रसंज्ञा-
संसाधितकनकगिरिप्रस्थानशौर्यौदार्यगांभीर्यधैर्याद्यगणितगुणगणग्रामाभिरा-
मपूरितयाचककामकृतपरार्थव्यायामप्राप्तमहाराजनाम श्रीमनृपशाहपौत्रेण
बालक्रीडनव्याजनिर्व्याजनिजनिग्रहागतजंभदंभसंरंभभरितप्रबळाफजलकक्ष
स्थलोद्दालनक्छिन्नछालनोछलितरुधिरप्रवाहोपलिप्तदेहोद्भासितप्रकटनृसिंहस्व-
पावलेपसिंहानुसारिकृताति विकृतसिंहदुर्गोछालपंचसप्ततिसहस्राश्ववारव्यूहव्यू
हितसैनिकांतर्गतभावपंचास्यादिप्रचंडतरराजपुत्रानेकविधसंरक्षितदिल्लींद्राभि-
माननिधानीभूतसुरत्राणमातुळमर्दनाविष्कृतजयद्रथरचितपार्थनरावतारनिक्षेप-
यौवनारंभगृहीत म्लेंछक्षयदीक्षाक्षपितानेकविधविजातीयताम्रभेदोद्भावितद-
क्षाध्वरध्वंसनदक्षनिग्रहानुग्रहसमर्थमहोदग्रोग्रवेषानुक्षेपदिल्लींद्रमानप्रध्वंसनपटु-
करदीकृतविजयपुराधीश्वरभाग(गा)नगरेशादिछत्रपतिप्रार्थ्यमानभुजछायसह-
जप्रयाणोछ्रायपलायितप्रबलःपठाणपुरसर समाक्रांतकार्नाटकप्रांतकर्णाक-
र्णननितांतक्लांतसमस्तसामंतचक्रशिरश्चूडामणिमंजरीपुंजपिंजरितपदपंकज-
कंजिलेक्षणक्षत्रियकुलावतंसभृशबलान्वयोदधिविधुमंडलायमानमही-
मंडलाखंडलछत्रपति शिवराज पुत्रेणानेकदेवप्रार्थनप्रादुर्भूतबालभावेंद्र-
प्रस्थाधिनाथानुज्ञातमल्लयुद्धदत्ताज्ञाभंग संगातिरिक्तातिरक्तिमद्वचनर चनानु-
रंजितचक्रवर्तिचित्तचक्रवर्तिलक्षणोपेतप्रारब्धप्राबल्यवैरिभावप्रविष्टप्रधानादि-
प्रबलदुष्टमंत्र्युपदिष्टज्येष्ठपुत्रराज्याप्रदानदुर्मंत्रदुरभिप्रायाभिप्रेतनीलपीतोपाधि-

परिष्वक्तस्फाटिकमणिप्रायहृत्सौजन्यैकनिकेतसापत्नरोषाक्रांतराज्ञीरागानुसारि-
पितृभावोपदिष्टशिवराजछत्रपत्याशयपरिज्ञानमात्रपितृभक्तिवैमुख्यभीरु-
धर्मपरिपाटिप्रक्रमाक्रमितदाशरथिरामविक्रमप्रक्रियप्रोत्साहपरित्यक्तपादांतसं-
क्रांततृणतुछसार्धकोटिद्रव्याद्यदुर्गबाहुल्यातिदुर्गमराज्यभारगृहीतस्वल्पाश्ववा-
रसंभारावरंगाश्वपतिसेनाधिपति संमिलनसंपादितसप्तसहस्त्राश्ववारवैभवसं-
भावितभूपालदुर्गग्रहणदुराग्रहग्रस्तदलेलासुरसंयोजितजानुसमासादितप्रक-
टिततृतीयनेत्रकृशानुशंभुरोषाडंवरदक्षिणकराकलितसेकोशकृपाणचर्मावरस-
मासक्तवामकरवीराग्रेसरवीरकेसरिविहलबाणवर्षावलित्रस्ततांम्राग्रवर्तिषद्पंचो-
छालनिगृहीतसमस्तयोधगणाक्रांतदुर्गप्रांतहेलोल्लंघितदिल्लींद्रदलपरित्यक्तधर्म-
पत्यनुषंगसंशीलितपराक्रमाकलनानुसृतदशरथाचरणशिवचरणकमलप्रहृष्टतात
प्रेमसंप्राप्तराज्यतरणिमंडलसरणिसमनुसारलोकांतरितभानुकुलभानु-संवर्धितवै-
भवभरितभूरिदुष्टसमुदायसंरंभसमारब्धदौर्जन्यपंचसप्तसेवकसाहायिकशिवयो-
गिभूतिभूषितभालप्रदेशकवीवर्यकविकलशप्रोत्साहनसमुल्लसदरुणिमसंसक्तदृ-
ग्देशगृहीतस्वेष्टदेवतानिदेशप्रचंडतरदोर्दंडास्फालननिगृहीतखलखंडखंडितारा
तिमुंडमंडलिकाप्राप्तिप्रचंडप्रनृत्तचंडीशवरवरिष्ठघोषितसर्वाभीष्टनिजाज्ञाडिंडि-
मरवोद्घोषसंतुष्टप्रजासंघद्विजदेवौघविहिताशीःपरंपरापरिपूर्णायुःसाधितसंपूर्णा-
श्वसमुदायोदंचन्मंचकाधिरोहणछत्रधारणावहेलितदिल्लीशाद्यनेकछत्रपतिध्रुव-
प्राप्तप्रकृष्टदुर्गाधिपत्यदक्षिणाद्दग्वीक्षणलब्धसकलदक्षिणविविधदक्षिणाप्र-
दानाभिनंदितविद्वज्जननिंदितदेवशाखिनिजप्रचंडप्रतापतपनतापिताखर्वगर्वख-
र्वीकृतारिवर्गदारुदारुणस्वयंशस्तौमशरत्सोममंडितोद्वेलडिंडीरपिंडपांडुरापार-
पारावारवेलाललितेलावलयविराजमानराजाधिराज श्री शंभुराज छत्रपति-
ना विहितं युग्मव्योमरसेंदुसंवलितसमातिक्रांतनृपशालिवाहनशकरौद्रवत्सर-
नभस्यसितदशमींदुवासरसमयराज्यावाप्त्यनेहाप्रतिज्ञातचतुर्विंशतिकृष्टलमित-
शुद्धकलधौतघटितदशसहस्त्रसंख्याकसुरत्राणीय वराहार्पणं प्राप्तराज्याभि-
वृध्यर्थाभिमतार्थसिध्यर्थगुरुपादुकापूजनपुरःसरं श्रीपादुकापूजननिमित्तं
सकलविपक्षक्षयार्थमायुरारोग्यैश्वर्यपुत्रपौत्राद्यभिवृध्यर्थं प्रत्यब्दं स्वीयस्वामीय
पुत्रपौत्रपारंपर्यक्रमेण चालनीयं उपभोक्तव्यं च सुंदरीमंदिरमंडनार्थानुदत्त-
सहजनिजकरोर्ध्वंकरणपुष्करकुंचनोपहसितैरावतमहत्वमत्तमातंगवल्गुवल्गन-
विजितरविरथतुरंगमालिवाजिरत्नाग्रगण्योच्चैःश्रवससमानजातीयपंचाश्वसां-
गोपांग याप्ययानप्रतिवर्षसंबंधिभक्ष्यभोज्यसहितसपरिजनसपरिवारस्वामि-
वार्षिकमप्येतदंतर्गतमेव बोद्धव्यं इत्यलं विस्तरपत्ररचनया शुभमस्तु ॥
दानपाळनयोर्मध्ये दानाछ्रेयोनुपालनं दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पदं

॥१॥ शिष्टाय द्विजवर्याय यो ददति धनं धरां ॥ कल्पकोटिशतं यावच्छिवलोके महीयते ॥ २ ॥ मद्वंशजाः परमहीपतिवंशजा वा पापादपेतमनसो भुवि भावि भूपाः ॥ ये पालयंति मम धर्ममिमं समग्रं तेभ्यो मया विरचितोंजलिरेष मूर्ध्नि ॥ ३ ॥ सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां काळे काळे पाळनीयो भवद्‌भिः ॥ इत्थं सर्वान्भाविनः पार्थिवेंद्रान् भूयो भूयो याचते रामचंद्रः ॥ ४ ॥ एतत्पालयते यस्तु पूतात्मा धौतकिल्बिषः ॥ भुक्तिमुक्तिफळं प्राप्य मोदते कुलजैः सह ॥ ५ ॥ शके राज्याभिषेकस्य सप्तमे रौद्रवत्सरे ॥ भाद्रे सितेनंगमृगौ चंद्ररुद्रे च संगवे ॥ ६ ॥ नारायणाध्वरींद्रस्य रघुनाथाभिधः सुतः ॥ आमात्यो दानपत्रेस्मिन्लेखनालंकृतिं व्यधात् ॥७॥ लेखनालंकार

संमत आबाजी

चंद्र ११ मास भाद्रपद सोनदेऊ सचीव

मास भाद्रपद ऊर्फ साबान

सन इहिदे समानीन अलफ

वार सुद बार शुध वार[3]

अनुमतं च दानाध्यक्ष मोरेश्वर पंडितरायस्य शुभमस्तु छ.[4]

[5]लक्ष्मीनृसिंहभक्तश्रीनीरेरायाब्धिसन्मणेः ॥ प्रल्हादवर्धिनी मुद्रा प्रल्हादस्य विजृंभते मर्या देयं विज यते[6]

(टीपा : १. 'मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य' इत्यादि श्लोकातील अक्षरे संभाजीच्या हातची आहेत असे दिसते.

२. मुळात 'तकटा' आहे ते 'तटाक' असे वाचावयाचे.

३. श्लोक ७ नंतर 'लेखनालंकार'पासून शेवटचा 'शुध बार' येथपर्यंतचा मजकूर मोडी लिपीत आहे.

४. 'अनुमतं' इत्यादि मजकूर देवनागरीत आहे.

५. ही मुद्रा प्रारंभी व मजकुराच्या डाव्या बाजूस आहे.

६. 'मर्यादा' शिक्का प्रत्येक जोडावर पाचदा उठविला असून पाच जोडांचा हा सबंध कागद आहे.)

— ४० —

सं. द., प. ३५/१८
रा. ८ फाल्गुन शु. १३

श. १६०३ फाल्गुन शु. १३
इ. १६८२ फेब्रु. १०

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी कोणतीही राजमुद्रा नाही; २. सुरुवातीच्या तीन ओळींनंतर डावीकडे मोरेश्वरसुत नीळकंठ याचा लंबवर्तुळाकारी शिक्का; ३. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का)

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ८ दुर्मति संवत्सरे फाल्गुन शुध त्र [यो] दसी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस सिंव्हासनाधीश्वर श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी याणी राजश्री विनायेक उमाजी देशाधिकारी प्रांत पुणा यासी आज्ञा केली ऐसी जे सूर्याजी बिन मालोजी जाधव आंबाजी बिन धारोजी जाधव व अनाजी बिन अंबोजी जाधव पाटील व रयेत मौजे परिंचे प्रांत मजकूर हुजूर येऊन विदीत केले की मौजे मा।र व मौजे हडगुरे सनिध आहे या दों गावास सिंवेच्या जमिनीचे भांडण लागले होते म्हणोन पूर्वी सन खमस खमसैन अलफमधें गोताच्या साक्षीने आमच्या व हडगुरेकरांच्या राजीपणे संता माहार मौजे परिंचे याणे दिव्याचे नीतीने अइरिणीचे दिव्य केले तो खरा जाला दिवीं उतरला नागा माहार मौजे हडगुरेकर येणे साउली केली खोटा जाला म्हणौन महजरही जाला ऐसे असता हडगुरेच्या पाटिलानी मागत्याने सिवेच्या जमिनीस द्वाही देउनू कथला केला आणि भांडणाचे जमिनीत हडगुरेकरानी नागर धरिला आम्ही द्वाही दिधली त्यास हडगुरेकरे बहिरजी पाटेल मौजे धनकवडी मदत आणून आम्हा प [रिंचे]-करास जखमा केल्या त्याउपरी सिवापूरच्या मुकामी राजश्री निलो पंडित प्रधान यांजवली फिर्याद जाला तेही हडगुरे येथील मेंगोजी बिन सूर्याजी ताकवला पाटील व बहिरजी पाटील धनकवडी आणून समागमे दिवाण लोक व गोत देउनू सिंवेस पाठविले तेही भांडणाचे सिंवेची जमीन मनास आणिता आधी नागर हडगुरेकरानी त्या [जमिनीत ध] रिला आम्ही परिंचेकर द्वाही देऊ लागले म्हणौन कल्हावती करून आम्हा परिंचे-करास जखमा केल्या हे खर जाले त्यांचा महजरही जाला त्यांवरून मेंगोजी मजकुरास राजश्री प्रधानपंती वितंडगडी अदबखाना ठेविले म्हणोन तपसिले विदीत केले तरी अइरिणीचे दिव्य परिंचकरी केले ते समई प्रांत मजकुरीचे गोत होते तेही जिवंत असतील त्यांसही मनास आणौन त्या महजर व दिव्यप्रमाणे वर्तवणे हडगिरेकरांस लायेनी कथला करू न देणे { देणे } तालीक लिहून घेऊन [असल] परिंचेकरांस परतोन देणे जाणिजे

रुजू

सुरू सुद पौ। छ १६ रबिलावर

– ४१ –

सं. द., प. ३४/१८ — श. १६०४ वैशाख व ३
रा. ८ वैशाख व. ४ — इ. १६८२ मे १५

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी संभाजीची बहुदळी पिंपळपानी ' शंभोः शिवजातस्य ' मुद्रा; २. सुरुवातीच्या तीन ओळींनंतर डाव्या बाजूस मोरेश्वर नीळकंठ मुख्य प्रधान याचा वाटोळा शिक्का; ३. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ८ दुंदुभी नाम संवत्सरे वैशाख बहुल चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस सिंव्हासनाधीश्वर श्रीराजा शंभू छत्रपती स्वामी याणी सूर्याजी पाटील बिराजर आबाजी पाटील व रयानी मौजे परिंचे ता। नीरथडी सुबा पुणें यांसि दिल्हे अभयपत्र ऐसे जें तुम्हीं हुजूर येऊन विदीत केले [की] आपणामधें व हडवगरेकरामधें सिवेचा कथला [लागला] होता त्याचा निवाडा कैलासवासी [*मो. जा.] स्वामीचे [वेली] जाला होता तेव्हां हडवगरेकर खोटे जाले आपण दिव्य केले [खरे] जालो यैसें असोन हडवगरेकर मागती कथला करि [तात] तरी स्वामीनें पारपत्य केले पाहिजे म्हणौन त्यावरून हे वर्तमान मनास आणाया स्वामींने हुजरून राजश्री खंडेराऊ पानसंबल यांला पाठविले ते जाऊन सदरहू वर्तमान हमशाही गोत मेलऊन मनास आणिलें आणि विनायेक उमाजी देशाधिकारी पुणें व शंकराजी राम देशाधिकारी कडेवलीत व देसमुख देसकुलकरणी आदि करून वरकडांचे गोही साक्षीने [महजर हुजूर] आणिला तो स्वामींने मनास आणिला ते तुम्ही परिंचेकर खरे जालेत हें नेमस्त जालें त्यावरून तुम्हाला हरकी होन पा। १०० येकसे व हडवगरेकर खोटे जाले त्यांला गुन्हेगारी होन पा। २०० दोनीसे येणें हुजूर जमा धरून उसूल वेवविला आणि तुम्हांला हें अभयेपत्र सादर केलें असे तरी कोणेविसीं शकअंदेशा न धरितां सुखें गावावरी असणें किर्दी मामुरी करून आबादानी करणें हडवगरेकर तुम्हांसी याउपरी कथला करितील तरी आपलें केलें पावतील ताकीद होईल तुम्हाला हे अभये असे जाणिजे

रुजू सुरू सुद

■ ■ ■

– ४२ –

सं. द. श. सुमारे १६०३-०४
इ. सुमारे १६८३

श्री

अखंडित लक्ष्मी प्रसन परोपकारमूर्ती राजमान्य राजश्री दताजीपंत गोसावी यासी

सेवक दियानतराऊ नमस्कार विनति उपरी मौजे कठापूर सा। कोरेगाव पा। वाई तेथील कुलकरण व जोईसी केशवभट थिटे याचे मिरास हाली राजश्री मोरोपंताचे मुतालीक [* मो. जा.] यास सिवाजी भाडलेकर याने गैरवाका मौजे मा।रीचे कुलकरण आपले म्हणोन सागोन त्यास कठापुरास घेऊन जाऊन मौजे मा।री केशभटाचा पुतण्या अताजी कुलकरण चालवीत आहे त्यास कोणाचे मिरास खातोस म्हणोन दाठा देऊन किले सतारेस चाल म्हणोन धरून चालविले आणि मार्गी त्यापासून बलत्कारेच कागद लिहून घेतले की पधरा रोजानी आपले वडिलास घेऊन येणे न येसी तरी मिरासीस समंध नाही यैसे लिहून घेउनू मौजे मजकुरीचे गुडोजी पटेलाचे हाती देऊन निरोप दिल्हे असे तरी मौजे मा।रीचे कुलकरण व जोईसी मिरास केशवभटाचे असे सिवाजी भाडलेकर गैरमिरासी त्यास समंध नाही येक दोनी वेळा गोतमुखे निवाडा होऊन गेले असे सिवाजी भाडलेकरास समंध नाही मिरास भट गोसावी याचे असे रा। मोरोपंताचे मुतालीक यानी सिवाजी भाडोलकराचे गैरवाका गोस्टी आहे। कोनत्याच्या बोले कठा-पुरास जाउनू केशवभटाचे पुतण्यास दाठा देऊन कागद लिहून घेतले असे यैसियास गोसावी यानी मोरोपंताचे मुतालिकास सागोन अताजीपासून कागद लिहून घेतले असे तो परतोन देविजे अनी सिवाजी भाडलेकर नसता कथला करितो त्यास वरजोर ताकीद केली पाहिजे की भट गोसावी याचे नाव घेतलिया तू जाणेस येविषई विशेष लिहावे तरी गोसावी विवेकी आहेत

■ ■ ■

– ४३ –

सं. द., प. १२६२/४
रा. २८ भाद्रपद शु. ७

श. १६२३ भाद्रपद शु. ७
इ. १७०१ ऑगस्ट २९

(१. पत्राच्या आरंभी मध्यभागी दुसरा शिवाजी याची अष्टकोनी ‘ प्रतिपच्चंद्र ’ मुद्रा; २. सुरुवातीच्या तीन ओळीनंतर डाव्या बाजूला प्रथम नीलकंठ मोरेश्वर प्रधान

याचा पिंपळपानी शिक्का; ३. त्याला लागून उजव्या बाजूस परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि याची अष्टकोनी मुद्रा; ४. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का.)

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २८ वृष नाम संवत्सरे भाद्रपद शुध सप्तमी भृगुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणी देशमुख व देशकुलकर्णी व मुकदमानी व सेटे माहाजनानी व रयानी व बाजे उदमीयानी पा। सिराले यासि दिल्हे अभयपत्र ऐसे जे तुम्ही हुजूर येऊन विनती केली की लस्करच्या व गनिमाच्या उपसर्गाकरिता पा। मजकूरची रयेत व आपण परागंदा होऊन माहाल खराब पडिला आहे ऐशास स्वामी कृपालु होऊन अभयपत्र सादर करितील तरी आपण रयतेस धीर भरवसा देऊन जागांजागां जाऊन जे रयत राहिली आहे ते आणून मामुरी करून म्हणोन विदीत केले त्यावरून हें अभयपत्र सादर केलें असे तरी तुम्हीं कोण्हेविशीं शक न धरिता पा। मजकुरी आपलाल्या ठिकाणावरी येऊन राहाणें रयेत जे परागंदा जाली आहे तिचा दिलासा करून आणून गांवगना वसाहत करवणें कीर्द मामुरी करून दिवाणची वेरीज विलायत शर्त उगवणी करून देणें तुम्हास जुलूम जाजती होणार नाहीं व काहीं उपसर्ग लागणार नाहीं कोण्हेविशीं चिंता न करणें अभये असे जाणिजे [* नि.] लेखनालंकार

मुरू सुद

■ ■ ■

— ४४ —

सं. द., प. ७६५/३
रा. ३४ ज्येष्ठ व. १

श. १६२९ ज्येष्ठ व. १
इ. १७०७ जून ५

(१. पत्राच्या शेवटी ' मर्यादा ' शिक्का)

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित्संवत्सरे ज्येष्ट बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणी राजमान्य राजश्री रायाजी मलार नामजाद प्रांत गंगथडी वराड यासि आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ति बचंभट वाराणसीकर यांस तुम्हाकडून रुपये १०० येकसे देवविले होते ते तुम्ही पाववीलें नाही तरी ब्राम्हणास

कर्जाचे परिहारास यैवज देवविला तो न पाववावा म्हणजे काये याउपरी पेशजी देवविले प्रो। पाववणे जाणिजे [*नि.] बहुत काय लिहिणे.

सुरू सुद बार

(**टीप :** शाहूने स्वतःला सातान्यास राज्याभिषेक करवून घेण्यापूर्वी आणि ताराबाई आपलाच अंमल अजून स्वराज्यात चालू आहे अशा भावनेतून आपल्या मुलाच्या नावे राज्य करीत असता हे पत्र लिहिलेले आहे.)

■ ■ ■

पत्रांचा कालानुक्रम

तारीख	पत्र क्रमांक
१५४० डिसेंबर २१	३३
१५८० सुमारे	२६
१५८६ ऑक्टोबर २७	२७
१५९२ ऑगस्ट २१	१
१६२८ डिसेंबर ४	१२
१६३६ ऑगस्ट ८	१३
१६५५ जानेवारी २१	१४
१६५५ ऑगस्ट ३१	१५
१६५६ जुलै १७ नंतर	३४
१६५६ सप्टेंबर–ऑक्टोबर	१६
१६५८ नोव्हेंबर २९	१७
१६७०–७१	३५
१६७२ मे १०	१८
१६७४ जून २४	३६
१६७४ जुलै ७	१९
१६७७ फेब्रुवारी १५	३७
१६७९ जानेवारी २६	३८
१६७९ मे ४	२८
१६८० जून ४	२०
१६८० ऑगस्ट २७	३९
१६८१ मार्च २७	२१
१६८२ फेब्रुवारी १०	४०
१६८२ मे १५	४१
१६८२ सुमारे	४२
१६८८ ऑक्टोबर १४	२
१६८८ सुमारे	२९
१६८९ ऑक्टोबर ३१	३
१६८९ डिसेंबर १९	४
१६९० ऑक्टोबर २	३०
१६९४ ऑगस्ट १२	२२
१६९६ ऑगस्ट २३	२३
१६९७ जूनपूर्वी	५
१७०१ ऑगस्ट २९	४३
१७०१ सप्टेंबर-ऑक्टोबर	३१
१७०२ ऑगस्ट १४	६
१७०२ ऑक्टोबर १८	२४
१७०२ ऑक्टोबर १९	२५
१७०५	३२
१७०६ मे २४	७
१७०७ जून ५	४४
१७०८ पूर्वी	८
१७०८ पूर्वी	९
१७०८ पूर्वी	१०
१७०८ पूर्वी	११

सूची

(आकडे पत्रक्रमांकांचे आहेत)

मंडळ–वृत्त

१. महाराष्ट्र इतिहास परिषद : १९८३ अधिवेशन

(संक्षिप्त वृत्तान्त)

महाराष्ट्र इतिहास परिषदेचे १९८३ चे अधिवेशन पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळाने दि. २ जून ८३ ते ६ जून ८३ असे पाच दिवस भरविले होते.

परिषदेचे उद्घाटन : महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष माननीय श्री. जयंतरावजी टिळक यांनी केले. मा. टिळक यांनी यावेळी भारत इतिहास संशोधक मंडळाने केलेल्या संशोधनक्षेत्रातील कामगिरीबद्दल संतोष प्रगट केला आणि हे कार्य अशाच जोमाने चालवावयाचे असेल तर लायक संशोधकांना पुरेसे वेतन व सुखसोयी उपलब्ध करून येथे नेमावयास हवे असे सांगितले. या बाबतीत अधिक सहानुभूतीने लक्ष घालण्याचे आवाहन त्यांनी महाराष्ट्र शासनाला केले. हा पाया तयार होत असताना इतिहासाच्या संशोधनात व लेखनात जास्तीत जास्त वस्तुनिष्ठा राखावयास पाहिजे असेही त्यांनी प्रतिपादन केले.

मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. ग. ह. खरे यांनी मंडळापाशी असणाऱ्या संशोधन सामग्रीची माहिती देऊन जास्तीत जास्त संशोधकांनी तिचा फायदा घ्यावा असे सुचविले. मंडळाचे अध्यक्ष प्रा. सांकलिया यांनी १९८३ च्या या अधिवेशनाचे वेगळेपण कशात आहे याचे विवेचन केले. एकाच विषयावर अनेकांचे निबंध मागविल्यास चर्चा अधिक उद्बोधक होईल या विचाराने ‘ गेल्या पंचवीस वर्षांतील महाराष्ट्रेतिहासाचे संशोधन ’ हा विषय निवडला आहे, आणि याचा उपयोग म्हणून येत्या पंचवीस वर्षांत कोणत्या क्षेत्रात विशेष संशोधन करावयास हवे हेही समजेल असे त्यांनी सांगितले.

सत्र पहिले : प्रागैतिहासिक महाराष्ट्र (३।६।८३, सायंकाळी ८–३० ते १२)

अध्यक्ष : प्रा. हं. धी. सांकलिया.
प्रमुख निबंध : प्रा. म. के. ढवळीकर.

प्रा. ढवळीकर यांनी प्रागैतिहासिक क्षेत्रात गेल्या पंचवीस वर्षांत झालेल्या प्रगतीची कल्पना दिली. इनामगावच्या ताम्रपाषाणयुगीन अवशेषांच्या उदाहरणाच्या साहाय्याने प्रागैतिहासिक अवशेषांचा अन्वयार्थ लावण्याचे नवे कोणते मार्ग उपलब्ध झाले आहेत हे विशद केले.

इतर शोधनिबंधांचे लेखक व त्यांचे विषय पुढीलप्रमाणे होते : डॉ. श. न. राजगुरू– पर्यावरणाच्या अध्ययनाचा इतिहाससंशोधनासंबंधी उपयोग. डॉ. र. श्री. पप्पू–चिरकी- नेवासा इ. ठिकाणच्या अश्मयुगीन अवशेषांचे उत्खनन व नवे शोध. डॉ. एम. डी काजळे– उत्खननातील अवशिष्ट धान्यकणांवरून तत्कालीन समाजाचे अन्न आणि शेतकी, भोवतालच्या वनस्पती यांची कल्पना. प्रा. शां. भा. देव– विदर्भातील महापाषाणयुगीन संस्कृतीचा परिचय ;(लोहयुगाचा प्रारंभ करणारी ही संस्कृती प्रागैतिहासिक व ऐति- हासिक समाजांना जोडणारा दुवा ठरते).

सत्राचे अध्यक्ष प्रा. सांकलिया यांनी प्रागैतिहासिक समाजांबद्दलच्या माहितीचा विस्तार वाढला तसे त्यांना समजून घेण्याचे आपले सामर्थ्य वाढले आहे असे सांगितले.

सत्र दुसरे : प्राचीन काळ–मौर्य ते वाकाटकअखेर.

(३।६।८३, दुपारी ३–३० ते सायं. ७–३०)

अध्यक्ष : प्रा. ग. ह. खरे
प्रमुख निबंध : प्रा. शां. भा. देव.

प्रा. देवांच्या मते पंचवीस वर्षांपूर्वी ज्ञात असणाऱ्या इतिहासाच्या आराखड्यात सध्या कोणताही महत्त्वाचा बदल घडलेला नाही. पूर्णपणे नवे म्हणता येईल असे ज्ञान गवसलेले नाही.

इतर शोधनिबंधः डॉ. सौ. शोभना गोखले–सातवाहनांच्या नाण्यांवरून तत्कालीन सांस्कृतिक जीवनावर पडणारा प्रकाश. डॉ. रा. श्री. मोरवंचीकर– पैठण येथील सात- वाहन राजधानीसंबंधीच्या आख्यायिका आणि योग्य ठिकाणी उत्खनन होण्याची आवश्यकता. डॉ. सुरेश जाधव– जुन्नर परिसरातील अवशेष व गुंफा यांच्या संकलित अध्ययनाने ज्ञात होणारा हीनयान काळातील इतिहास.

सत्र तिसरे : पूर्व मध्यकाळ–चालुक्य ते यादवअखेर

(४।६।८३, सकाळी ८–३० ते दुपारी १२)

अध्यक्ष : प्रा. म. के. ढवळीकर
प्रमुख निबंध : डॉ. सौ. शोभना गोखले.

कान्हेरीला मिळालेले शिलालेख आणि कंधारसारख्या राष्ट्रकूटांशी संबंधित स्थळांचे सर्वेक्षण यातून या काळातल्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर चांगला प्रकाश पडतो असे सौ. गोखले यांनी प्रतिपादिले.

इतर शोधनिबंध : डॉ. श्री. वा. चितळे–कल्याण – नालासोपारा सर्वेक्षणाची माहिती.

अध्यक्ष प्रा. ढवळीकर यांनी कारणमीमांसा करणाऱ्या संशोधनाची आवश्यकता स्पष्ट केली.

सत्र चौथे : ऐतिहासिक साधने (४।६।८३, दुपारी ३-३० ते ५)

अध्यक्ष : प्रा. ग. ह. खरे
प्रमुख निबंध : श्री. वि. गो. खोबरेकर

श्री. वि. गो. खोबरेकर यांनी, महाराष्ट्र शासनाने गेल्या पाव शतकांत जमविलेल्या व प्रसिद्धिलेल्या कागदपत्रांची माहिती दिली.

इतर शोधनिबंध : डॉ. स. मा. गर्गे–करवीर इतिहासविषयक साधनांची माहिती.

अध्यक्ष प्रा. ग. ह. खरे यांनी मंडळाकडे जमा झालेल्या नव्या साधनांचा परिचय करून दिला.

सत्र पाचवे : सल्तनत कालखंड (४।६।८३, सायंकाळी ५ ते ७-३०)

अध्यक्ष : प्रा. ग. ह. खरे
प्रमुख निबंध– डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी

प्रा. कुलकर्णी यांनी फारसी कागदपत्रे, हस्तलिखिते आणि मध्ययुगीन इतिहासावरील गेल्या पंचवीस वर्षांतील प्रकाशने यांचा आढावा घेतला., पाकिस्तानमध्ये या विषयावर संशोधन होत असल्याचीही माहिती दिली.

इतर शोधनिबंध : भा. गो. तमस्कर– मलिक अंबरविषयक स्वतःच्या ग्रंथाची माहिती. डॉ. म. श्री. माटे– सल्तनत कालखंडाच्या संशोधनाला पुरातत्त्वाच्या आधारे झालेला प्रारंभ, विशेषतः दौलताबादच्या संदर्भात.

सत्र सहावे : मराठेशाहीचा काळ (५।६।८३, सकाळी ८-३० ते दुपारी १२)

अध्यक्ष : प्रा. ग. ह. खरे
प्रमुख निबंध– डॉ. कृ. ना. चिटणीस

प्रा. चिटणीस यांनी गेल्या पंचवीस वर्षांतील या विषयसंबंधीच्या साधनांचा व संशोधनपर लिखाणाचा आढावा घेऊन सांगितले की आता केवळ राजकीय इतिहासावर दृष्टी न ठेवता सामाजिक आणि आर्थिक इतिहासावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

इतर शोधनिबंध : डॉ. वा. द. दिवेकर–महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासाबद्दलच्या संशोधनात झालेली प्रगती. प्रा. एन्. जी. भवरे–पेशवेकालीन दलित समाज. डॉ. जी. ए. गवळी– पेशवेकालीन सनातनी जातिव्यवस्था व गुलामगिरी. प्रा. एम्. एन्. माने– पेशवेकालीन गुन्हेगारी व शिक्षा.

सत्र सातवे : ऐतिहासिक भूगोल (५।६।८३, दुपारी ३–३० ते ५)

अध्यक्ष : प्रा. चं. धु. देशपांडे.

प्रमुख निबंध–प्रा. दि. मु. वाघ.

प्रा. वाघ यांनी महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अभ्यासात भूगोलाच्या ज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सह्याद्रीच्या भूरचनेचा मराठी राज्याच्या रचनेत झालेला उपयोग उदाहरणांसहित दाखविला.

इतर शोधनिबंध : महाराष्ट्रातील दुर्ग–शिल्प.

अध्यक्ष डॉ. चं. धु. देशपांडे यांनी या विषयाच्या सखोल ज्ञानाची आवश्यकता प्रतिपादन करून महाराष्ट्राचा ऐतिहासिक नकाशासंग्रह तयार करणे आवश्यक आहे असे सांगितले.

सत्र आठवे : ब्रिटिश राजवट (५।६।८३, संध्याकाळी ५ ते ७–३०)

अध्यक्ष : प्रा. नी वि. सोवनी.

शोधनिबंध : प्रा. जे. व्ही. नाईक– १९ व्या शतकातल्या महाराष्ट्रातील प्रबोधनाची सुरुवात. प्रा. अरुण भोसले– सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्यसंग्राम. डॉ. सौ. शरावती शिरगावकर– १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य.

प्रा. अरुण जोशी– १९व्या शतकातील महाराष्ट्रातील काही सुधारक. डॉ. सुषमा वर्मा– माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन व महाराष्ट्रातील अव्वल इंग्रजी शासन. डॉ. सुमिता गुप्त – १० व्या शतकातील मुंबई शहरातील वास्तुशिल्पावर ब्रिटिश वसाहतवादाचा झालेला परिणाम.

सत्र नववे : कला व शिल्प (६।६।८३, सकाळी ८–३० ते १२)

अध्यक्ष : प्रा. शां. भा देव

प्रमुख निबंध – डॉ. म. श्री. माटे

डॉ. माटे यांनी अलीकडच्या काळात मराठी कला व शिल्प याविषयी जास्त संशोधन होऊ लागले आहे आणि त्यामुळे मराठेशाहीत कलाशिल्पाची उत्तम जोपासना झाल्याचे ज्ञान आता नव्याने झाले आहे असे सांगितले.

इतर शोधनिबंध : डॉ. गो. बं. देगलूरकर–मराठवाडयातील यादवकालीन शिल्पे. डॉ. सु. र. देशपांडे–यादवकालीन मंदिरांवरील मूर्तिकाम. डॉ. रा. श्री. मोरवंचीकर–पैठणचे शिवकालीन वास्तुकाम व विशेषतः काष्ठशिल्प. डॉ. कमल चव्हाण–मराठेशाही-तील भित्तिचित्रे. डॉ. उषा रानडे–मराठेशाहीतील पट, हस्तलिखिते व लघुचित्रे.

अध्यक्ष प्रा. शां. भा. देव यांनी मराठेशाहीतील कलासंभाराचे संशोधन ही नवी भर आहे असे सांगितले.

यानंतर मंडळाचे एक चिटणीस डॉ. म. श्री. माटे यांनी उपस्थित प्रतिनिधी, महाराष्ट्र शासन, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद या संस्था, मंडळातील स्वयंसेवी कार्यकर्ते व सेवक यांचे आभार मानले व या परिषदेचा समारोप केला.

परिषदेच्या दि. ५।६।८३ रोजी झालेल्या साधनविषयक सत्रात पुढील ठराव संमत करण्यात आला.

" मध्ययुगीन व मराठेशाही इतिहासाच्या संशोधनामधे फारसी भाषा व मोडी लिपी यांचे असणारे महत्त्व ध्यानात घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांचे ज्ञान देण्याच्या यत्नांना भरीव साहाय्य करावे. "

—सूचक : प्रा. ग. ह. खरे
—अनुमोदक : डॉ. जी. ए. गवळी

सर्वानुमते संमत

महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या १९८३ च्या अधिवेशनात सहभागी झालेल्या प्रतिनिधींची नावे सोबतच्या यादीत आहेत. याखेरीज श्री. बा. रं. सुंठणकर, श्री. म. श्री. दीक्षित, श्री. मुकुंद देशपांडे इत्यादींनी निबंधांवरील चर्चेत भाग घेतला.

महाराष्ट्र इतिहास परिषद : पुणे अधिवेशन : २ ते ६ जून १९८३

परिषदेत भाग घेतलेल्या प्रतिनिधींची नावे :

✦ भा. इ. सं. मंडळ, पुणे :

प्रा. ह. धी. सांकलिया (अध्यक्ष)
प्रा. ग. ह. खरे (कार्याध्यक्ष)
श्री. वि. त्र्यं. शेटे (उपाध्यक्ष)
प्रा. भा. कृ. आपटे
प्रा. सदाशिव आठवले
प्रा. स. मा. गर्गे
श्री. र. श्री. ठिपसे
श्री. चं. ज. अभंग
श्री. सु. दि. खरे
कु. कल्पना शहा
डॉ. सुरेश देशपांडे
प्रा. नी. वि. सोवनी
प्रा. म. आ. कुलकर्णी
डॉ. चिं. ना. परचुरे
श्री. ना. भा. आदमणे

✦ पुणे विद्यापीठ, पुणे :

डॉ. कृ. ना. चिटणीस
डॉ. कु. सुषमा वर्मा
प्रा. प्र. त्रिं. मालशे

✦ डेक्कन कॉलेज, पुणे :

प्रा. शां. भा. देव
प्रा. म. के. ढवळीकर
डॉ. म. श्री. माटे
डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी
डॉ. शोभना गोखले
डॉ. श. न. राजगुरु
डॉ. र. श्री. पप्पू
डॉ. कमल चव्हाण
डॉ. एम्. डी. काजळे
डॉ. उषा रानडे

डॉ. गो. बं. देगलूरकर
प्रा. सौ. सुमिता गुप्त
श्री. एम्. आर. कुलकर्णी
डॉ. सुरेश वसंत जाधव

✦ गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे
डॉ. वा. द. दिवेकर

✦ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर :
श्री. एम्. एन्. माने
श्री. अरुण भोसले.

✦ मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :
प्रा. एन्. जी. भवरे
डॉ. रा. श्री. मोरवंचीकर
डॉ. जी. ए. गवळी

मुंबई विद्यापीठ, मुंबई :
प्रा. जे. व्ही. नाईक
प्रा. अरुण जोशी (ठाणे)
प्रा. सौ. शरावती शिरगावकर

✦ पुरातत्त्व विभाग (महाराष्ट्र)
श्री. आर. एन्. हेगडे

✦ इतर
श्री. वि. गो. खोवरेकर, मुंबई
प्रा. दि. मु. वाघ, पुणे
प्रा. चं. धु. देशपांडे, पुणे
डॉ. श्री. वा चितळे, पुणे
डॉ. ग. गं मुजुमदार, पुणे
प्रा. श्री. म. दीक्षित. पुणे
प्रा. भा. गो. तामस्कर, पुणे
प्रा. प्र. के. घाणेकर, पुणे
प्रा. प्र. न. देशपांडे, धुळे
प्रा. मु. ब. शहा, धुळे

---

२. श्री. य. न. केळकर-सत्कार-भाषण

(मंडळाचे दीर्घकालचे संशोधक आणि कार्यकर्ते, शाहिरी वाङ्मयाचे सुप्रसिद्ध अभ्यासक श्री. य. न. तथा अण्णासाहेब केळकर यांच्या वयाला ऐंशी वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त बुधवार दि. २०-१०-८२ रोजी मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. समारंभाचे अध्यक्षस्थान मंडळाचे उपाध्यक्ष आचार्य वि. प्र. लिमये यांनी स्वीकारले होते. या प्रसंगी कार्याध्यक्ष प्रा. ग. ह. खरे, श्री. ग. ल. ठोकळ, श्री. प. क. जोशी, श्रीमती शांताबाई ओक आदींची श्री. केळकर यांच्या गुणगौरवपर भाषणे झाली. श्री. केळकर यांनी उत्तरादाखल केलेले भाषण पुढे दिले आहे.)

" आज मंडळाने माझा सत्कार केला, म्हणजे मी गेली ५०-६० वर्षे इतिहास-संशोधन क्षेत्रात, माझ्या कुवतीप्रमाणे जी अल्पस्वल्प कामगिरी केली तिच्याबद्दल त्याने दिलेली शाबासकीच समजतो.

हा घरचा अहेर आहे. वास्तविक घरचा अहेर हा इतर अहेरांच्या आधी देण्याची वहिवाट असते. पण हा अहेर इतक्या उशिरा व सर्वांत शेवटी होत असला तरी त्याची किंमत मी कमी मानीत नाही. म्हण आहे की 'शेजीनी भरविला साखर-भात आणि आईने फिरविला पाठीवरून हात'. दोहोंची किंमत सारखीच. किंबहुना, आईने पाठीवरून फिरविलेल्या हाताचीच महती अधिक आहे.

मंडळाचा आणि माझा कमीतकमी ५५–६० वर्षांचा संबंध आहे. या ना त्या नात्याने मंडळाशी निकट संबंध असलेले जुने लोक माझ्या माहितीप्रमाणे आता फक्त तीनच दिसतात. एक स्वतः मीच. दुसरे आपले ग. ह. खरे आणि तिसरे म्हणजे अगदी परवापर्यंत हरकामी नोकर म्हणून येथे राबलेले गोपाळराव कुलकर्णी !

आपले भारत इतिहास संशोधक मंडळ मला आकाश–मंडळासारखेच भासते. साठ वर्षांच्या त्याच्या विस्तारात संशोधक ताऱ्यांची गर्दीच गर्दी दिसेल. खरे आणि राजवाडे हे या नभोमंडळातील चंद्र–सूर्य ! त्यांची सर अर्थातच इतर कोणाही ग्रहाला किंवा ताऱ्याला येणे शक्यच नाही. नंतर दत्तोपंत आपटे आणि दत्तोपंत पोतदार. हे त्यातले गुरू आणि शुक्र ! त्यानंतर शेजवलकर. हे शनि किंवा मंगळ किंवा दोन्हीही ! नंतर बुध म्हणजे चिंतोपंत कर्वे. या नभोमंडळातील सप्तर्षिमंडळ कोणचे ? तर पांडोबा पटवर्धन, स. ग. जोशी, कृष्णाजीपंत पुरंदरे, शंकरराव जोशी, ग. ह. खरे, दि. वि. काळे आणि ओतूरकर यांचे. नभोमंडळात कृत्तिका–पुंज हवाच. आणि तो तसा येथे आहेही. डॉ. शोभना गोखले, डॉ. कमल गोखले, डॉ. उषा रानडे व डॉ. कमल चव्हाण यांच्या रूपाने तो झळकत आहे.

मंडळात हमेशा आढळणारे हे ग्रह किंवा तारे झाले. पण यांच्याखेरीज अनेक संशोधक–ताऱ्यांनी हे मंडळ गजबजलेले आहे. साठ वर्षांच्या काळात या मंडळात प्रकाश पाडणाऱ्या संशोधक–ताऱ्यांची मोजदाद करावयाची म्हटली तर ती पुरी होणार नाही.

अशा कमीअधिक तेजस्वी ताऱ्यांच्या गर्दीतला मीही एक क्षुद्र तारा स्वतःला समजतो. पण त्याचबरोबर मला अभिमान वाटतो की मी क्षुद्र असलो तरी तारा आहे, म्हणून स्वयंप्रकाशी आहे. दिव्याप्रमाणे मला दुसऱ्या कोणी पेटवावे लागत नाही. किंवा काजव्याप्रमाणे मी क्षणजीवीही नाही. मी चिरंजीव आहे. कारण मनाच्या खऱ्या आवडीनेच मी संशोधन व्यवसायात शिरलो, दुसऱ्या कोणाच्या उठावणीने नाही. इतर कोठे जुळत नाही म्हणून जुने ऐतिहासिक कागद चिवडण्याच्या धंद्यात मी पडलो असेही नाही. ती माझी उपजत आवड आहे, आणि ती आवड माझ्या मृत्यूपर्यंत मला सोडणार नाही खास !

माझे संशोधन सर्वंकष विशाल नाही. ते मर्यादित आहे. आपल्याला आवडलेला विभाग निवडून तेवढयातच माझे संशोधन व लिखाण झालेले आहे. शिवाय, ते संशोधनही सर्वच मौलिक आहे असेही नाही. त्यात महत्त्वाचे व गैरमहत्त्वाचे असे दोन्ही असणारच. पण महत्त्वाचे वा गैरमहत्त्वाचे हा शेरा परिस्थितिसापेक्ष आहे. कारण आज

क्षुल्लक भासणारे संशोधन कालांतराने त्या विषयाच्या अभ्यासकाला एखाद्या घबाडासारखे मौलिक ठरते!

तसे पाहिले तर सर्वच संशोधक अगदी मुळांत एकाच तोलाचे किंवा लायकीचे असतात. शिडी भिंतीला लावून जमिनीवर आडवी ठेवलेली असते, तेव्हा तिच्या सर्व पायऱ्या सारख्याच उंचीच्या असतात. फरक पडतो तो, ती शिडी भाग्याच्या भिंतीला उभी केली जाते तेव्हा! तेव्हा मग ती पायरी वरची, ही पायरी खालची असा भेद केला जातो. याचा अर्थ इतकाच की मानसन्मान, कीर्ती ही दैवाधीन आहे. ती ज्याच्या त्याच्या नशिबाप्रमाणे मिळते, पण मुळात सर्व एकाच योग्यतेचे असतात. म्हणून संशोधक हा स्तुतिनिंदेची किंवा मानसन्मानाची अपेक्षा न करता आपले काम आपापल्या छंदाने करीत असतो. त्याचा आत्मविश्वास कसा असतो ते माझ्या संशोधनातच आढळलेल्या एका जुन्या अभंगावरून उत्तम रीतीने प्रकट झालेले मला आढळले. तो अभंग असा :

उन्हाच्या तेजाने माळावरी गारा
तळपती त्याही जैशा वैरागरा।
उसना तो झोत होता पाठमोरा
पावे त्यांना त्या मूळचा चेहरा! ॥ १ ॥

नसो माझ्या लेखी बाजाराचा भाव
असो प्रसिद्धीच्या बाजाचा अभाव।
गूण काय होतो हीन त्यावाचून
चंदना सहाण मिळेना म्हणून? ॥ २ ॥

अजिंठा वेरुळ गुप्त डोंगरात।
म्हणोनी गुणांत उणी का होतात?
दिवसास दिवे लावूनिया तेथ
ज्ञाते शिल्परत्ने जातात शोधीत ॥ ३ ॥ ''

———

ग्रंथ-परीक्षण

भाषा व साहित्य : संशोधन

संपादक-डॉ. वसंत स. जोशी

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ४११०३०

१९८१, पृ. ५८५, मूल्य रु. ३०-००

" भाषा व साहित्य : संशोधन " हा डॉ. वसंत स. जोशी यांनी संपादित केलेला ग्रंथ एका मर्यादित उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी तयार केलेला आहे, आणि ते उद्दिष्ट या ग्रंथाद्वारे साध्य झाले आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. पीएच्. डी. ही विद्यापीठाकडून मिळणारी सर्वोच्च पदवी समजली जाते. अकरावी-बारावीपासून थेट एम्. ए. पर्यंत अभ्यासक्रमाची पक्की चौकट आखलेली असते. मात्र पीएच्. डी. साठी विद्यार्थी आल्यावर त्याला अशा चौकटीचा आधार मिळत नाही. आपली शोधबुद्धी आणि मार्गदर्शकाचे उपलब्ध होणारे मार्गदर्शन यावर त्याला सर्वस्वी अवलंबून राहावे लागते. थोडक्यात हा अभ्यास बव्हंशी आत्मनिष्ठ होतो. किंवा त्याहीपेक्षा तो विद्यार्थी ' स्व 'तंत्र बनतो-एका अर्थी ' निराधार ' बनतो. ही स्थिती घालविण्यासाठी, ' संशोधन मार्ग व तंत्र ' यांचे शिक्षण देणारा ' एम्. फिल् ' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. यातून तंत्रशुद्ध संशोधनाचे शिक्षण कितपत मिळते, तसेच सर्व विद्यापीठांनी केवळ या एका उदात्त हेतूनेच तो शिक्षणक्रम सुरू केला आहे की त्यात आणखी काही हितसंबंध आहेत हे प्रश्न बाजूला ठेवू. अशा शिक्षणक्रमाची आवश्यकता निर्विवाद आहे. डॉ. जोशी यांचा प्रस्तुत ग्रंथ हीच निकड भागवितो. यापूर्वी, प्रा. ग. ह. खरे यांनी ' संशोधकाचा मित्र ' हे पुस्तक प्रसिद्ध केले होते. तसेच वेगवेगळ्या संशोधकांनी आपले अनुभवही प्रसिद्ध केले होते. विशेषतः ' रामदास आणि रामदासी 'च्या प्रास्ताविकात कै. शंकरराव देव यांनी कथन केलेले अनुभव कोणाही संशोधकाला मार्गदर्शक ठरतील असेच आहेत. मात्र सर्वांगपरिपूर्ण असा मार्गदर्शक ग्रंथ या ग्रंथाच्या रूपाने प्रथमच उपलब्ध होत आहे.

ग्रंथातील लेखांचे स्वाभाविकच काही गट पडतात. डॉ. केळकर, डॉ. सु. बा. कुलकर्णी, डॉ. आजगावकर यांचे लेख भाषाशास्त्रासंबंधी आहेत. प्रा. पठाण, प्रा. कोलते, कै. व्यंकटेशशास्त्री जोशी यांचे लेख प्राचीन हस्तलिखिते, त्यांची उपलब्धी जतन, आणि अन्वयार्थ यासंबंधी आहेत. प्रा. खरे, डॉ. शोभना गोखले, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांचे लेख प्रामुख्याने अभिलेख, ऐतिहासिक कागदपत्रे, त्यांचा कालनिर्णय अशासारख्या विषयांवर आहेत. श्री. दु. का. संत, स. गं. मालशे, हे. वि. इनामदार यांचे लेख, संशोधन विषयांची निवड, संशोधकीय प्रबंधाची रचना किंवा बांधणी अशा-

सारख्या विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या विषयांवर आहेत. याशिवाय कोशरचना, विशिष्ट कालखंडाचा अभ्यास अशासारखे इतर सर्व लेख संशोधकांना निश्चित उपयुक्त ठरतील. ग्रंथामध्ये ज्यांचे लेख समाविष्ट केलेले आहेत ते सर्व लेखक आपापल्या क्षेत्राशी संबंधित व तज्ज्ञ असल्याने त्या त्या विषयावरील त्यांचे लेखन अर्थातच मोलाचे उतरले आहे.

गेली कित्येक वर्षे संशोधनाचा आणि संशोधन मार्गदर्शकाचा व्यवसाय करीत असल्यामुळे, मला प्रा. वसंत जोशी यांची प्रस्तावना अतिशय सार्थ वाटली. विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रत्येक प्राध्यापकाला संशोधन पदवीची उपाधी असणे अनिवार्य केल्यामुळे, एरवी जे लोक संशोधनाच्या वाटेला गेले नसते ते नाइलाजाने या कामाकडे वळले. उत्तम शिकविणारा शिक्षक हा कित्येकदा चांगला संशोधक होऊ शकत नाही; उलटपक्षी उत्कृष्ट संशोधक हा चांगला महाविद्यालयीन शिक्षक होईलच अशी खात्री नसते. बहुतांशी असे अनुभवाला येते की अभ्यासकाचे यांपैकी एका कक्षावर तरी प्रभुत्व असते. संशोधन करणे ही गोष्ट फारशी सोपी नाही. माणूस अतिशय बुद्धिमान असला किंवा कष्टाळू असला तरी त्याचे ठायी संशोधकीय वृत्ती असावी लागते. तेव्हा शिकवून संशोधक तयार करता येतात या प्रमेयावर फारसा भरवसा ठेवता येत नाही. दुसरे असे की मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेल्या अनेक शिक्षकांना मार्गदर्शन करण अतिशय कष्टप्रद होते. कारण स्वतः संशोधन न केलेले शिक्षक केवळ एखाद्या विशिष्ट पदावर आहेत म्हणून त्यांना मार्गदर्शनाची मान्यता मिळते. स्वतः संशोधन व ग्रंथलेखन केलेले नसल्यामुळे दुसऱ्याला त्याची संथा देताना त्यांची किती तारांबळ उडत असेल याची सहज कल्पना करता येईल.

अशा परिस्थितीत संशोधनपद्धतीचे शिक्षण ग्रंथाद्वारे, म्हणजे व्यक्तिनिरपेक्षरीत्या मिळणें अत्यंत आवश्यक आहे. प्रा. जोशी यांचा हा ग्रंथ हे काम उत्तम रीतीने करील याविषयी शंका नाही.

—म. श्री. माटे

५४८

वाचकांचा पत्रव्यवहार

अनंत निवास
२३५ अ, सावरकर मार्ग
दादर, मुंबई ४०० ०२८
दि. ११-२-१९८३

स. न. वि. वि.

मंडळाच्या गेल्या त्रैमासिकात (खंड ६०, अंक १-४, शक १९०३, सन १९८१) श्री. कृ. ना. चिटणीस यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यातील पृ. ६९ वरील, राजवाड्यानी सन १८९५ त 'भाषांतर' मासिक सुरू केले, हे विधान बरोबर नाही. ते २० जानेवारी १८९४ मध्ये सुरू केले (आधार : भा. वा. भट, राजवाडे-चरित्र, १९४६, पृ. ६४).

मंडळाचे कार्य सदैव उत्कर्षाच्या दिशेने वर्धिष्णु होवो ही सदिच्छा.
कळावे, ही विनंती.

आपला,
(डॉ.) र. वि. हेरवाडकर

———

भारत इतिहास संशोधक मंडळाची अलीकडील प्रकाशने

मराठी प्रकाशने

१. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १७ (१९७३), पृ. ८०	रु. १२-००
२. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १४ (१९७३), पृ. ११२	रु. १२-००
३. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १५ (१९७४), पृ. ११२	रु. १२-००
४. ब्राह्मणकालीन समाजदर्शन, ले. वि. वि. भिडे (१९७४), पृ. ३३	रु. ४-००
५. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १६ (१९७५), पृ. १११	रु. १२-००
६. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १८ (१९७६), पृ. १०८	रु. १२-००
७. ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, सं. ग. ह. खरे, सह सं. गो. त्र्यं. कुलकर्णी (१९७६), पृ. ४२३	रु. ३०-००
८. मराठी इतिहासाची विस्तृत शकावली, सं. ग. ह. खरे (१९७७), पृ. ९८	रु. १६-००
९. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १७ (१९७८), पृ. ११९	रु. १६-००
१०. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १९ (१९७९), पृ. १६८	रु. २०-००
११. भा. इ. सं. मंडळ-प्रकाशित लेख, साधने इ.-सूची, सं. चिं. ना. परचुरे, मु. श्री. कानडे (१९८१), पृ. ३४७	रु. ४०-००

इंग्रजी प्रकाशने

12. Tal Paintings, by Usha Ranade, Kamal Chavan (1976), pp. 36	Rs. 50-00
13. Bhagavata Purana, by M. S. Mate, Usha Ranade (1979), pp. 36	Rs. 50-00
14 Survey of Material in Marathi on the Economic and Social History of India, by V. D. Divekar (1981), pp. 116	Rs. 25-00